दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३०४ I मंगळवार १८ ऑगस्ट २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

# ट्रम्पला आणा, पण नगर-मनमाड रस्ता पूर्ण करा

## सचिन अहिर यांच्या वक्तव्याची जिल्ह्यात चर्चा

### २० वर्षांपासून रखडलेल्या महामार्गावर पुन्हा राजकीय टोलेबाजी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** अहिल्यानगर–मनमाड महामार्गाचा प्रश्न हा आता केवळ रस्त्याच्या दुरवस्थेचा विषय राहिलेला नाही; तो अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणातील कायमचा चर्चेचा मुद्दा बनला आहे. गेल्या दोन दशकांहून अधिक काळ रखडलेल्या या महामार्गावरून आंदोलने झाली, आश्वासने मिळाली, पाहण्या झाल्या, ठेकेदार बदलले; मात्र रस्ता आजही पूर्णत्वाला गेलेला नाही. त्यामुळे आता या रस्त्याच्या रखडण्यावरून राजकीय कोट्या आणि आरोप-प्रत्यारोपही रंगू लागले आहेत.

भाजपचे नेते तथा माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी अलीकडे या महामार्गाच्या



कामाला विलंब होण्यामागे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या इराणविषयक भूमिकेचा संदर्भ दिला होता. क्रूड ऑईलच्या पुरवठ्यावर परिणाम झाल्याने रिफायनरीची क्षमता आणि त्यातून मिळणाऱ्या डांबराच्या उपलब्धतेवर परिणाम झाल्याचा त्यांचा दावा होता. त्यांच्या या वक्तव्याची विधान परिषदेचे उपसभापती सचिन अहिर यांनी मिश्कील पद्धतीने री ओढली.

शनिशिंगणापूर येथे दर्शन घेतल्यानंतर



पत्रकारांशी बोलताना अहिर यांनी, 'डोनाल्ड ट्रम्पला आणा, पण नगर-मनमाड रस्ता पूर्ण करा,' असा टोला लगावला. त्यांच्या या एका वाक्याने गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या रस्त्याच्या प्रश्नाला पुन्हा राजकीय चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे.

नगर-मनमाड महामार्गाची दुरवस्था जिल्ह्यातील नागरिकांसाठी नवी नाही. राज्य महामार्ग असताना या रस्त्याच्या कामासाठी अनेकदा प्रयत्न झाले. आंदोलने झाली. लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा केला. त्यानंतर हा मार्ग राष्ट्रीय महामार्गाच्या (पान ४ वर)

### ट्रम्प कारणीभूत की व्यवस्थेचा 'महामार्गी' गुंता?

सुजय विखे पाटील यांच्या वक्तव्यानंतर रस्त्याच्या प्रश्नाला आंतरराष्ट्रीय संदर्भ मिळाला आणि त्यावर सचिन अहिर यांनी केलेल्या कोटीमुळे हा विषय पुन्हा चर्चेत आला. मात्र या राजकीय टोलेबाजीच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न कायम आहे की, २० वर्षांहून अधिक काळ एखादा राष्ट्रीय महामार्ग रखडण्यामागे नेमकी कारणे कोणती? डांबराची उपलब्धता, कंत्राटदार, निधी, भूसंपादन, प्रशासकीय मंजुरी, कामाची गुणवत्ता, वाहतूक व्यवस्थापन किंवा अन्य तांत्रिक अडचणी?, यापैकी कोणत्या कारणामुळे कामाला वारंवार विलंब झाला, याचे स्पष्ट आणि अधिकृत उत्तर नागरिकांसमोर येणे आवश्यक आहे.

# पालकमंत्रीपदाचा तिढा सुटला; राष्ट्रवादीला ठेंगा

## रायगडमध्ये भरत गोगावले यांची बाजी; नाशिकची धुरा गिरीश महाजनांकडे



रायगडमध्ये गोगावले, नाशिकमध्ये महाजन अशी विभागणी करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीतील दीर्घकाळ प्रलंबित असलेली राजकीय कोंडी सोडवली आहे. मात्र, या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची पुढील भूमिका काय राहणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महायुती सरकारच्या स्थापनेनंतर पावणेदोन वर्षांपासून रखडलेल्या रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रीपदाचा तिढा अखेर सुटला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्त्या जाहीर केल्या असून रायगडची जबाबदारी रोहयो मंत्री भरत गोगावले, तर नाशिकची धुरा जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या दोन्ही पदांसाठी आग्रही असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला मात्र या निर्णयातून धक्का बसल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

रायगडच्या पालकमंत्रीपदासाठी महायुतीतील राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) आणि शिवसेना (शिंदे) या दोन्ही घटक पक्षांमध्ये गेल्या काही काळापासून रस्सीखेच सुरू होती. राष्ट्रवादीच्या मंत्री आदिती तटकरे यांच्याकडे यापूर्वी रायगडची जबाबदारी होती. मात्र, शिवसेनेचे मंत्री भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्रीपदावरील आपला दावा सातत्याने कायम ठेवला होता.

अखेर शासनाच्या निर्णयानुसार गोगावले यांची रायगडच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती झाल्याने राष्ट्रवादीचा दावा बाजूला पडला असून शिंदे गटाने या राजकीय संघर्षात बाजी मारल्याचे मानले जात आहे.

रायगडच्या पालकमंत्रीपदाचा निर्णय हा महायुतीतील सत्तासमतोलाच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात आहे. स्थानिक पातळीवर गोगावले यांच्या समर्थकांकडून पालकमंत्रीपदासाठी सातत्याने आग्रह धरला जात होता. अखेर त्यांची नियुक्ती झाल्याने शिंदे गटाच्या समर्थकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या निर्णयामुळे रायगड जिल्ह्यातील आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नाशिकचे राजकीय व प्रशासकीय महत्त्व पाहता या निर्णयाकडे विशेष लक्ष लागले होते. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमधील मोठ्या विकासकामांचे नियोजन आणि प्रशासकीय समन्वयाची जबाबदारी महत्त्वाची आहे.नाशिकच्या पालकमंत्रीपदासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि शिवसेना (शिंदे) गटाचे मंत्री दादा भुसे यांच्या नावांची जोरदार चर्चा होती. मात्र, अखेर दोन्ही नेत्यांना बाजूला ठेवत भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. कुंभमेळ्याच्या नियोजनाची जबाबदारी यापूर्वीच गिरीश महाजन यांच्याकडे देण्यात आली असल्याने पालकमंत्रिपदही त्यांच्याकडेच सोपविण्याचा निर्णय भाजपसाठी महत्त्वाचा मानला जात आहे.

रायगड आणि नाशिक या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांच्या पालकमंत्रीपदावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये दीर्घकाळ सुरू असलेल्या रस्सीखेचेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. रायगडची जबाबदारी शिवसेना (शिंदे) गटाकडे, तर नाशिकची जबाबदारी (पान ४ वर)

# नियमपालनानंतरही परवाना निलंबित

## एफडीएला हायकोर्टाचा पाच लाखांचा दणका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** नागरिकांच्या आरोग्याच्या हितासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून (एफडीए) करण्यात येणाऱ्या कारवायांचे मुंबई उच्च न्यायालयाने यापूर्वी कौतुक केले असले, तरी कायदा व नियमांचे पालन झाल्यानंतरही काही आस्थापनांचे परवाने निलंबित ठेवण्याच्या पद्धतीवर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पुण्यातील मिठाई दुकानाच्या प्रकरणात ९८ टक्के नियमांचे पालन झाल्याचे पुनर्तपासणीत स्पष्ट झाल्यानंतरही परवाना पूर्ववत न केल्याने उच्च न्यायालयाने एफडीएला पाच लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे.

प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. नागरिकांच्या आरोग्याच्या हितासाठी एफडीएचा हेतू चांगला असला तरी कारवाई करताना अतिरेक होऊ नये, असे न्यायालयाने स्पष्ट केले.



१२ जून रोजी अन्नातून विषबाधा झाल्याच्या तक्रारीनंतर एफडीएकडून विविध दुकानांची तपासणी करण्यात आली होती. त्यामध्ये पुण्यातील गुरूनानक डेअरी अँड स्वीट्सची १३ जून रोजी तपासणी झाली. दुकानातील स्वच्छता आणि कर्मचाऱ्यांच्या आरोग्यविषयक स्वच्छतेबाबत आक्षेप नोंदवून त्याच दिवशी दुकानाचा परवाना निलंबित करण्यात आला.

यानंतर दुकानमालकांनी एफडीए आयुक्तांकडे अपील करून नियमांचे पालन केल्याचा अहवाल सादर केला. १३ जुलै रोजी झालेल्या पुनर्तपासणीत दुकानाने तब्बल ९८ टक्के नियमांचे पालन केल्याचे आढळून आले. मात्र, त्यानंतरही परवाना पूर्ववत करण्यात आला नाही. त्यामुळे दुकानमालकांनी उच्च न्यायालयात धाव घेतली.

नियमांचे पालन केल्याचा अहवाल सादर करूनही परवाना पूर्ववत न केल्यामुळे आपला साडेआठ लाख रुपयांहून अधिक महसूल बुडाल्याचा दावा दुकानमालकांच्या वतीने न्यायालयात करण्यात आला. याची दखल घेत न्यायालयाने एफडीएला पाच लाख रुपयांचा दंड ठोठावला असून ही रक्कम एका महिन्यात दुकानमालकांना नुकसानभरपाई म्हणून देण्याचे आदेश दिले.

न्यायालयाने एफडीएच्या कार्यपद्धतीवर भाष्य करताना, पुनर्तपासणीत जवळपास सर्व नियमांचे पालन झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर परवाना तातडीने पूर्ववत करणे अपेक्षित होते, असे निरीक्षण नोंदवले. नियमांचे पालन झाल्यानंतरही खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या आस्थापनांचे परवाने निलंबित ठेवण्याचे धोरण विपरीत परिणाम करणारे(पान ४ वर)

# धीरज परदेशी हत्याप्रकरणी आणखी पाच जण ताब्यात

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** मुकुंदनगर परिसरात महानगरपालिका कर्मचारी धीरज कचरूसिंग राजपूत-परदेशी यांच्या हत्या प्रकरणात भिंगार कॅम्प पोलिसांनी आणखी पाच जणांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. या कारवाईमुळे या प्रकरणाच्या तपासाला आणखी वेग आला असून, पोलिसांकडून तिघांची कसून चौकशी सुरू आहे. भिंगार कॅम्प पोलिसांनी इम्रान मुसा सय्यद, जाहीद नुसरत शेख, आरमान लिकायत सय्यद, हुजैफ साजिद शेख, मोहम्मद रशाद इम्रान सय्यद (सर्व रा. मुकुंदनगर) यांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, मुकुंदनगर परिसरातील दर्गा दायरा येथे पथदिव्यांच्या दुरुस्तीचे काम करत असताना धीरज परदेशी यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला होता. गंभीर जखमी झालेल्या धीरज यांचा उपचारादरम्यान ९ ऑगस्ट रोजी मृत्यू झाला होता. या घटनेनंतर अहिल्यानगर शहरात संतापाची लाट उसळली होती. या प्रकरणात भिंगार कॅम्प पोलिसांनी यापूर्वी मुख्य संशयितांसह आरोपींना अटक केली आहे. मुख्य संशयितांना हैदराबाद येथून ताब्यात घेण्यात आले होते.

त्यानंतर आरोपींना मदत केल्याच्या आरोपावरून इतरांवरही कारवाई करण्यात आली होती. दरम्यान, आणखी पाच जणांना ताब्यात घेतल्याने या प्रकरणात नेमकी त्यांची भूमिका काय आहे, मुख्य आरोपींशी त्यांचा संबंध आहे का ? आणि हल्ल्यानंतर आरोपींना पळून जाण्यास अथवा लपण्यास त्यांनी मदत केली का,? याबाबत पोलिसांकडून तपास केला जाणार आहे. या कारवाईनंतर धीरज परदेशी हत्या प्रकरणातील तपासात आणखी कोणती माहिती समोर येते आणि आणखी कोणावर कारवाई होते, याकडे अहिल्यानगरकरांचे लक्ष लागले आहे.

# गळा चिरून खुनाचा प्रयत्न; तिघांना १० वर्षांची सक्तमजुरी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : अनैतिक संबंधांना विरोध केल्याच्या रागातून महिलेच्या छातीवर बसून ब्लेडने गळा चिरत तिच्यावर जीवघेणा हल्ला केल्याप्रकरणी श्रीगोंदा सत्र न्यायालय क्र. २ चे न्यायाधीश एस. एच. साळुंखे यांनी तिन्ही आरोपींना दोषी ठरवत प्रत्येकी १0 वर्षांची सक्तमजुरी व प्रत्येकी एक हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास प्रत्येकी एक महिना सक्त कारावास भोगावा लागणार आहे.

या खटल्याची सविस्तर माहिती अशी की, ही घटना ११ जुलै २0१५ रोजी चोराची वाडी, श्रीगोंदा येथे घडली होती. या प्रकरणातील फिर्यादी व जखमी साक्षीदार अश्विनी सागर जाधव (वय २२) यांनी आरोपी सागर उर्फ गोरख पांडुरंग जाधव याचे आरोपी रुक्मिणी संतोष जाधव हिच्याशी असलेल्या कथित अनैतिक संबंधांना विरोध केला होता. याचा राग मनात धरून आरोपींनी संगनमताने अश्विनी यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचे अभियोग पक्षाचे म्हणणे होते.हल्ल्यावेळी सागर उर्फ गोरख जाधव याने अश्विनी यांच्या छातीवर बसून ब्लेडने त्यांचा गळा चिरला, तर त्याचा चुलता संतोष दत्तात्रेय जाधव याने त्यांचे पाय दाबून धरल्याचा आरोप होता. याचवेळी रुक्मिणी संतोष जाधव हिने टणक वस्तूने अश्विनी यांच्या तोंडावर मारहाण केल्याने त्यांचे दात पडल्याचेही प्रकरणात नमूद करण्यात आले होते.या घटनेप्रकरणी श्रीगोंदा पोलिस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक १७१/२0१५, भादंवि कलम ३0७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक ए. एम. बेहराणी यांनी केला. प्रकरणाचा खटला सेशन केस क्र. २२६/२0१९ असा चालला.तब्बल अकरा वर्षांनंतर या प्रकरणाचा निकाल १७ ऑगस्ट २0२६ रोजी लागला. न्यायालयाने सागर उर्फ गोरख पांडुरंग जाधव, संतोष दत्तात्रेय जाधव आणि रुक्मिणी संतोष जाधव या तिन्ही आरोपींना भादंवि कलम ३0७ व ३४ अंतर्गत दोषी ठरवून प्रत्येकी दहा वर्षांची सक्तमजुरी सुनावली. सरकार पक्षातर्फे श्रीगोंदा येथील सहाय्यक सरकारी वकिलांनी जिल्हा सरकारी वकील सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण चालविले. न्यायालयीन कामकाजात पो. हे. कॉ. नरुटे, पो. कॉ. म्हेत्रे, एएसआय यादव, महिला पो. हे.कॉ. खामकर व पो. कॉ. भोरे यांनी कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून मदत केली.२0१५ च्या जीवघेण्या हल्ल्याला २0२६ मध्ये न्यायालयीन निकाल मिळाला असून, तिन्ही दोषींना झालेली दहा वर्षांची शिक्षा हा या प्रकरणातील महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# १७ ऑगस्टला 'शिवचातुर्य दिन' साजरा होणार?

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ ऑगस्ट १६६६ रोजी आग्रा येथून केलेल्या ऐतिहासिक सुटकेच्या स्मरणार्थ 'शिवचातुर्य दिन' साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक पराक्रमाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी 'गरुडझेप' संस्थेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत, अशी माहिती राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी दिली.

पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी १७ ऑगस्ट हा दिवस दरवर्षी 'शिवचातुर्य दिन' म्हणून साजरा करण्याचा उपक्रम सुरू असल्याचे सांगितले. यानिमित्त आग्रा ते राजगड सुमारे १,३१० किलोमीटरची पायी व सायकल मोहीम आयोजित करण्यात आली आहे. आग्रा येथे महाराष्ट्र व उत्तर प्रदेश सरकारच्या समन्वयातून छत्रपती शिवाजी महाराजांचे



भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, वास्तुविशारद आभा लांबा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गरुडझेप संस्थेच्या मोहिमेत सुमारे २,२०० मावळे व ६० सायकलस्वार सहभागी झाले आहेत. चार राज्यांतील ७८ शहरांतून ही मोहीम राजगडाकडे मार्गक्रमण करणार आहे. आग्रा येथे सांस्कृतिक कार्यक्रम, शिवशौर्य नाट्यप्रयोग, युद्धकला व शौर्यप्रात्यक्षिकेही सादर करण्यात आली.

# 'मुद्दल-व्याज फेडले, तरी जमिनीवर हक्क'

## सावकाराच्या वारसांविरोधात आठवले यांच्याकडे तक्रार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** खाजगी सावकाराकडून घेतलेल्या कर्जाची मुद्दल व व्याजाची रक्कम पूर्णपणे फेडल्यानंतरही जमिनीवर सावकाराच्या वारसांकडून हक्क सांगत ताबा मिळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप पाथर्डी तालुक्यातील मिरी येथील औताडे कुटुंबीयांनी केला आहे. जमीन ताब्यात देण्यासाठी दबाव, दमदाटी व धमक्या दिल्या जात असल्याची तक्रार केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्याकडे करण्यात आली.



अहिल्यानगर दौऱ्यावर आलेल्या ना. आठवले यांची भेट घेऊन दिलीप राधाजी औताडे, बार्णबस बाबू औताडे, आनंदी उत्तम भाहवे, मंदा वसंत पाटोळे, बबीतादास गायकवाड व बी. डी. गायकवाड यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हाध्यक्ष सुनील साळवे यांच्या उपस्थितीत निवेदन दिले.

निवेदनानुसार, मिरी येथील सर्वे नं. ९५, गट नं. ९६ मधील ७.९२ हेक्टर जमीन शंकर खंडू औताडे यांच्या मालकीची होती. सन १९६७ मध्ये मुलाच्या लग्नासाठी त्यांनी खासगी सावकाराकडून ४०० रुपये कर्ज घेतले होते. त्यासाठी २० जुलै १९६७ रोजी गहाणखरेदीखत करण्यात आले. कर्जाची मुद्दल व व्याजाची रक्कम वेळोवेळी फेडण्यात आली; मात्र व्यवहारानंतर दस्तऐवजाची योग्य ती पूर्तता न झाल्याने जमिनीवरील हक्काचा प्रश्न कायम राहिल्याचे कुटुंबीयांचे म्हणणे आहे.

सावकाराच्या मृत्यूनंतर वारसांनी आता जमिनीवर हक्क सांगण्याचा प्रयत्न सुरू केल्याचा आरोप आहे. काही नातेवाईकांकडून पैसे घेऊन बंधनपत्र करून घेतल्याचे, तसेच फोन व मध्यस्थांमार्फत दबाव आणून धमक्या दिल्याचे निवेदनात म्हटले आहे. जातिवाचक शिवीगाळ व अपमान केल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

जमिनीशी संबंधित जुने दस्तऐवज, महसूल नोंदी, गहाणखरेदीखत व प्रत्यक्ष ताब्याची निष्पक्ष चौकशी करून जमीन कायदेशीर वारसांच्या नावे करण्यात यावी, तसेच धमकी व जातिवाचक अपमानाच्या आरोपांची चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

# फडणवीसांचा पुढचा मुक्काम दिल्ली की महाराष्ट्र?

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

भारतीय जनता पक्षात देवेंद्र फडणवीस हे आज केवळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री नाहीत, तर पक्षाच्या दुसऱ्या पिढीतील सर्वाधिक अभ्यासू, प्रशासनकुशल आणि विकासाभिमुख चेहऱ्यांपैकी एक मानले जातात. त्यामुळे ''फडणवीस दिल्लीला जाणार का?'' हा प्रश्न वेळोवेळी उपस्थित होतो. मात्र हा प्रश्न केवळ एका नेत्याच्या बदलीचा नसून भाजपच्या राष्ट्रीय नेतृत्वाच्या भावी रचनेशी, महाराष्ट्रातील सत्तासंतुलनाशी आणि आगामी दशकातील राजकीय समीकरणांशी जोडलेला आहे.

फडणवीसांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले तर तो सातत्य, संयम आणि संघटनात्मक निष्ठेचा आदर्श नमुना आहे. नागपूर महापौरपदापासून मुख्यमंत्रीपदापर्यंतचा त्यांचा प्रवास संघर्षातून घडला. २०१४ ते २०१९ या काळात त्यांनी महाराष्ट्रात पायाभूत सुविधा, गुंतवणूक, मेट्रो, समृद्धी महामार्ग आणि डिजिटल प्रशासन यांसारख्या प्रकल्पांवर ठसा उमटवला. सत्ता गेल्यानंतरही त्यांनी विरोधी पक्षनेते म्हणून आक्रमक भूमिका घेतली आणि २०२२ नंतर पुन्हा सत्तेच्या केंद्रस्थानी आले. ही पुनरागमनाची क्षमता त्यांच्या राजकीय वजनाची साक्ष देते.

मुख्यमंत्री म्हणून त्यांची सर्वात मोठी ताकद म्हणजे निर्णयक्षमता आणि प्रशासनावरची पकड. उद्योग, अर्थकारण आणि गुंतवणूकदारांशी संवाद साधण्याची त्यांची शैली इतर अनेक प्रादेशिक नेत्यांपेक्षा वेगळी आहे. जागतिक गुंतवणूक परिषद असो किंवा राज्यातील पायाभूत प्रकल्प, फडणवीस यांची भाषा विकासाभोवती फिरते. त्यामुळेच राष्ट्रीय पातळीवरही त्यांचे नाव चर्चेत राहते.

परंतु दिल्लीचा प्रश्न इतका सरळ नाही. भाजपमध्ये नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली गेल्या दशकात राष्ट्रीय नेतृत्वाची मजबूत चौकट उभी राहिली आहे. त्या चौकटीत पुढील पिढीतील सक्षम चेहऱ्यांची गरज पक्षाला निश्चितच आहे. अनेक राज्यांतील मुख्यमंत्री आपल्या राज्यापुरते प्रभावी असले तरी राष्ट्रीय संवाद, अर्थनीती आणि संघटनात्मक समन्वय या तिन्ही क्षेत्रांत समान ताकदीने उभे राहणारे नेते तुलनेने कमी आहेत. या पार्श्वभूमीवर फडणवीसांचे नाव पुढे येणे स्वाभाविक आहे.

मात्र राष्ट्रीय नेतृत्वासाठी केवळ क्षमता पुरेशी नसते; राजकीय वेळही तितकीच महत्त्वाची असते. महाराष्ट्र हा भाजपसाठी देशातील दुसऱ्या क्रमांकाचा राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा राज्य आहे. येथे आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि विधानसभा निवडणुका पक्षासाठी निर्णायक ठरणार आहेत. अशा वेळी राज्यातील सर्वात प्रभावी चेहरा दिल्लीला हलवणे भाजपसाठी राजकीय जोखमीचे ठरू शकते.

याच ठिकाणी दुसरा मुद्दा पुढे येतो तो म्हणजे महाराष्ट्रातील सत्ता-समीकरणांचा. महायुतीचे सरकार अनेक घटक पक्षांच्या समन्वयावर उभे आहे. अशा परिस्थितीत फडणवीस हे केवळ भाजपचे मुख्यमंत्री नाहीत, तर संपूर्ण आघाडीचे समन्वयकही आहेत. त्यांची अनुपस्थिती राज्यातील नेतृत्वाच्या स्पर्धेला खतपाणी घालू शकते. त्यामुळे दिल्लीतील संधी आणि महाराष्ट्रातील स्थैर्य यांच्यात पक्षाला संतुलन साधावे लागेल. फडणवीस दिल्लीत गेले तर ते अमित शाह यांच्यासाठी आव्हान ठरतील का, हा प्रश्नही चर्चेत असतो. प्रत्यक्षात भाजपची कार्यपद्धती पाहता अशी मांडणी अतिसुलभीकरण ठरेल. शाह आणि फडणवीस यांची राजकीय भूमिका वेगळी आहे. शाह हे संघटन आणि निवडणूक रणनीतीचे शिल्पकार मानले जातात, तर फडणवीस प्रशासन, अर्थकारण आणि राज्यकारभारातील कौशल्यासाठी ओळखले जातात. त्यामुळे स्पर्धेपेक्षा परस्परपूरक भूमिका अधिक वास्तववादी वाटते.

राष्ट्रीय राजकारणात जाण्यासाठी दिल्लीतच असणे आवश्यक आहे, ही समजूतही पूर्णपणे खरी नाही. ज्योती बसू यांनी आयुष्यभर पश्चिम बंगालमध्ये राहून राष्ट्रीय प्रभाव निर्माण केला. शरद पवार यांनी राज्य आणि केंद्र या दोन्ही पातळ्यांवर प्रभाव राखला. त्यामुळे फडणवीस महाराष्ट्रात राहूनही राष्ट्रीय धोरणांवर प्रभाव टाकू शकतात. आजच्या काळात माध्यमे, पक्षसंघटना आणि केंद्र-राज्य समन्वयामुळे भौगोलिक अंतराचा अडसर पूर्वीइतका राहिलेला नाही. तरीही भविष्यातील शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. २०२७ नंतरचे राष्ट्रीय राजकारण, उत्तर प्रदेशातील राजकीय घडामोडी, भाजपमधील नेतृत्वाची पुढील फळी आणि केंद्रातील मंत्रिमंडळाची पुनर्रचना या सर्व घटकांवर फडणवीसांच्या भूमिकेचे भविष्य अवलंबून राहील. पक्षाला जर विकासाभिमुख, संघनिष्ठ आणि प्रशासनाचा अनुभव असलेला राष्ट्रीय चेहरा पुढे आणायचा असेल, तर फडणवीस हे निश्चितच प्रमुख दावेदारांपैकी एक असतील.

आज मात्र वास्तव वेगळे आहे. महाराष्ट्रात उद्योग, शेती, पायाभूत सुविधा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि महायुतीतील समन्वय अशी अनेक आव्हाने त्यांच्या समोर आहेत. ही आव्हाने पूर्णत्वास नेणे हेच त्यांच्या राष्ट्रीय प्रतिमेला अधिक बळ देणारे ठरेल. राजकारणात काही प्रश्नांची उत्तरे तात्काळ मिळत नाहीत. काही वेळा अस्पष्टताच सर्वात मोठी राजकीय रणनीती असते. देवेंद्र फडणवीस यांच्या बाबतीतही हेच खरे आहे. दिल्लीचा दरवाजा त्यांच्यासाठी बंद नाही; पण तो उघडण्याची वेळ अद्याप आलेली नाही. आजची गरज महाराष्ट्राला नेतृत्वाची आहे, तर उद्याची गरज कदाचित देशाला असू शकते. फडणवीसांचा पुढचा अध्याय हा व्यक्तीच्या महत्त्वाकांक्षेपेक्षा भाजपच्या राष्ट्रीय गरजा आणि महाराष्ट्राच्या राजकीय वास्तवावर अधिक अवलंबून असेल.

# विषमुक्त नैसर्गिक शेतीचा बेलापूरातील महिला शेतकरी गटाचा संकल्प



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** शेतीतील वाढता उत्पादन खर्च कमी करण्याबरोबरच रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा अनावश्यक आणि बेसुमार वापर टाळून विषमुक्त, नैसर्गिक शेती करण्याचा संकल्प बेलापूर येथील श्री स्वामी समर्थ महिला शेतकरी गटातील महिलांनी केला. जैविक खते, जैविक कीटकनाशके तसेच पर्यावरणपूरक उपाययोजनांचा योग्य पद्धतीने वापर करून शेती अधिक शाश्वत करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

यावेळी कृषी विभागाचे लक्ष्मण डांगे, निलेश बिडवे तसेच पाणी फाउंडेशनचे सूर्यवंशी यांनी महिलांना मार्गदर्शन केले. पिकांच्या गरजेनुसारच निविष्ठांचा वापर करून उत्पादन खर्च कमी करणे, जमिनीची सुपीकता टिकविणे आणि पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी गटाच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून विविध ठिकाणी चिकट सापळे, फेरोमन सापळे, पक्षी थांबे, निंबोळी अर्क तसेच जीवामृताची आळवणी करण्यात आली. रासायनिक कीटकनाशकांवरील अवलंबित्व कमी करून पर्यावरणपूरक पद्धतीने पिकांवरील किडींचे व्यवस्थापन करण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.सेंद्रिय व नैसर्गिक पद्धतीने शेती केल्याने जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढून मातीची सुपीकता व भुसभुशीतपणा टिकून राहतो. पिकांची गुणवत्ता, चव आणि टिकवण क्षमता सुधारण्यास मदत होते. तसेच मित्र कीटक व मधमाशांचे संवर्धन होऊन पर्यावरणाचा समतोल राखण्यास हातभार लागतो. रासायनिक निविष्ठांचा अतिरेक टाळल्याने पाणी व मातीचे प्रदूषण कमी करण्यासही मदत होते.

या संकल्पात सिंधू कुताळ, उज्वला कुताळ, सुरेखा कुताळ, प्रतीक्षा भांड, वैशाली नवले, गायत्री कुताळ, विमल सोनवणे, विमल वारे, मेघा बंगाळ, मनीषा कुताळ, संगीता नवले, अर्चना सोनवणे, कविता वारे, कल्याणी कुताळ आदी महिला सहभागी झाल्या.

# म. फुले कृषी विद्यापीठात ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** महात्मा फुले कृषी विद्यापीठात देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणानंतर मार्गदर्शन करताना कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांनी, ज्ञान, संशोधन व तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध करण्यासाठी विद्यापीठाने कार्य करावे, असे आवाहन केले. कृषी विद्यापीठाने शिक्षण, संशोधन, विस्तार शिक्षण व नवोपक्रम क्षेत्रात उल्लेखनीय काम केले आहे. आतापर्यंत विद्यापीठाने १ लाख ६६ हजार १७० पदव्या प्रदान केल्या असून, यावर्षी ११ वाण, ५ कृषी यंत्रे आणि ८० तंत्रज्ञान शिफारशी प्रसारित केल्या जात आहेत. 'फुले समृद्ध गाव', 'फुले पोकरा संजीवनी गाव', 'शास्त्रज्ञ थेट शेतकऱ्यांच्या बांधावर' तसेच 'फुले कृषी महोत्सव' यांसारख्या उपक्रमांतून कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविले जात आहे. हवामान बदलाला सक्षमपणे तोंड देणाऱ्या वाणांची निर्मिती, डिजिटल तंत्रज्ञान आणि स्पीड ब्रीडिंगवर विद्यापीठाचे संशोधन सुरू असल्याचे डॉ. खर्चे यांनी सांगितले. यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थी वसतिगृह, विविध प्रयोगशाळा, प्रशिक्षण केंद्रे, गोदामे व नैसर्गिक शेती प्रकल्पातील सुविधांचे उद्घाटन करण्यात आले. शेतकरी-शास्त्रज्ञ उद्योजक मंचाचा शुभारंभही करण्यात आला. कार्यक्रमास विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डिपॉल पब्लिक स्कूलमध्ये शिवरायांच्या शौर्यगाथेने रंगली देशभक्तीचे नाट्याविष्कार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा :** डिपॉल पब्लिक स्कूल, श्रीरामपूर येथे देशाचा ८० वा स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शाळेत ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांनी तालुक्यातील विविध ठिकाणी देशभक्तीपर नृत्य तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथेतील 'अफजलखान वध' या प्रसंगाचा प्रभावी देखावा सादर केला. शाळेतील ध्वजारोहण सैन्यातील निवृत्त अधिकारी मेजर राजेंद्र आढाव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना भारतीय सैन्यदलातील करिअरच्या संधींबाबत मार्गदर्शन केले. एनडीए, आरआयएमसी, आयएमए देहरादून यांसारख्या संस्थांची माहिती देताना सैन्यातील सेवा ही प्रतिष्ठेची व अभिमानाची असल्याचे त्यांनी सांगितले. यानंतर विद्यार्थी व शिक्षकांनी वाकडी, पुणतांबा, हरेगाव तसेच श्रीरामपूर येथील प्रमुख चौकांमध्ये देशभक्तीपर गीते व 'अफजलखान वध'चा नाट्याविष्कार सादर केला. प्रत्येक ठिकाणी ग्रामस्थ, सरपंच व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे गावातील वातावरण देशभक्तीमय झाल्याच्या भावना ग्रामस्थांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमासाठी प्राचार्य फादर ए. बी. वर्गीस, संस्थेचे फादर फ्रांको, उपप्राचार्य सिस्टर पावना, सिस्टर जेन्सी, सिस्टर जेनी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. शेख व प्रियांक यांनी सूत्रसंचालन केले.

# गोंडेगावच्या पीएमश्री जिल्हा परिषद शाळेत ८० वा स्वातंत्र्यदिन उत्साहात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गोंडेगाव :** तालुक्यातील गोंडेगाव येथील पी एम श्री जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन अत्यंत उत्साहात आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. सकाळच्या सुमारास गावात काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य आणि देशक्तीपर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून सोडला. शाळेत शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदिप पोखरे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. याप्रसंगी सरपंच सागर बढे, उपसरपंच रवींद्र आमले, मुख्याध्यापिका वैशाली सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शानदार परेड, भाषणे, योग नृत्य आणि संगीत कवायत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत अरविंद व अरुंधती फोपसे यांनी शाळेला ५,००० रुपयांची देणगी सुपूर्द केली. याशिवाय पीएम श्री योजने अंतर्गत खेळण्याचे साहित्य आणि संगणक लॅबमधील एसीचे उद्घाटन करण्यात आले. विविध स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन गौरव करण्यात आला.

# विद्यार्थ्यांच्या मनातील सैनिकांप्रती कृतज्ञता थेट सीमेवरील जवानांपर्यंत

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर येथील भाजप महिला मोर्चा उत्तर जिल्हा सरचिटणीस तथा कौशल्य प्रतिष्ठानच्या अध्यक्षा पूजा हर्षद चव्हाण यांनी सैनिकांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा अनोखा उपक्रम राबविला शहरातील शा. ज. पाटणी विद्यालयात आयोजित या उपक्रमात तब्बल १९५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या जवानांसाठी स्वतःच्या शब्दांत पत्रे व शुभेच्छा संदेश लिहिले. विद्यार्थ्यांनी लिहिलेली ही पत्रे पूजा चव्हाण यांच्या माध्यमातून पोस्टाद्वारे सीमेवरील




जवानांपर्यंत पाठविण्यात येणार आहेत. देशाच्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र सेवा करणाऱ्या सैनिकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनात कृतज्ञता निर्माण करणे आणि देशभक्तीची भावना दृढ करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे आणि माजी खा. डॉ. सुजय विखे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भावना थेट जवानांपर्यंत पोहोचविणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले.

# पिचडगावातील बारवेचे मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते उद्या लोकार्पण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा:** तालुक्यातील पिचडगाव येथील सुमारे ८०० वर्षे प्राचीन मुक्ताई बारवचे सेवावर्धिनी पुणे यांच्या वतीने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारवेचे पुनर्वापर प्रकल्पा'अंतर्गत पुनरुज्जीवन करण्यात आले असून या बारवेचा लोकार्पण सोहळा राज्याचे सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांच्या हस्ते व पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे



पाटील,आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवार दि.१९ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता पिचडगाव येथे मुख्य बारवेच्या ठिकाणी करण्यात येणार आहे.

या प्रसंगी बारवेचे लोकार्पण प्रसंगी बारवेतील पाण्याचे जलपूजन तसेच संतश्रेष्ठ मुक्ताई यांच्या प्रतिमेचे पूजन व नामदार आशिष शेलार,पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.सेवावर्धिनी पुणे यांच्या वतीने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर बारवेच्या लोकार्पण सोहळयाच्या प्रसंगी पिचडगावसह पंचक्रोशीतील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन पिचडगाव ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थ पिचडगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे

# कर्मवीर दादासाहेब रुपवते यांचा इतिहास पुसण्याचा प्रयत्न; आंबेडकरी समाज आक्रमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** अगस्ती सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीत कर्मवीर दादासाहेब रुपवते यांचे महत्त्वपूर्ण योगदान असतानाही त्यांचा इतिहास जाणीवपूर्वक पुसण्याचा प्रयत्न संचालक मंडळाकडून होत असल्याचा आरोप समस्त आंबेडकरी समाजाच्या वतीने करण्यात आला. याबाबत वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश प्रवक्त्या उत्कर्षाताई रुपवते यांच्या नेतृत्वाखाली कारखाना प्रशासनाला निवेदन देण्यात आले.निवेदनात म्हटले आहे की, दादासाहेब रुपवते यांनी १९६८ ते १९७८ या काळात विधान परिषदेचे सदस्य म्हणून काम केले. तसेच १९७२ ते १९७५ आणि १९७५ ते १९७८ या कालावधीत त्यांनी राज्याचे कॅबिनेट मंत्री म्हणून विविध खात्यांची जबाबदारी सांभाळली. मुंबईत राजकीय व सामाजिक कार्य करत असतानाही त्यांनी अकोले तालुक्याशी असलेली नाळ कायम ठेवली.कोतुळचा जुना पूल, अकोलेतील मोठा पूल, निळवंडे धरण, अगस्ती अमृतसागर दूध संघ तसेच अगस्ती कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचा मोठा वाटा असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.सन १९९२ मध्ये अगस्ती सहकारी साखर कारखाना मंजूर करून आणताना दादासाहेब रुपवते यांनी विशेष प्रयत्न केले. ते कारखान्याच्या पहिल्या मुख्य प्रवर्तक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष होते, असा दावा करण्यात आला आहे.वार्षिक अहवालात दादासाहेब रुपवते यांचा साधा फोटोही प्रकाशित केला जात नसल्याने त्यांचे योगदान पुसण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला.

**कारखाना दादासाहेबांच्या कष्टातून उभा**

अकोले तालुक्याचा एकमेव औद्योगिक प्रकल्प असलेला अगस्ती कारखाना कै. दादासाहेब रुपवते यांच्या कष्टातून उभा राहिला आहे. त्यांचा इतिहास आणि योगदान पुसता येणार नाही. अध्यक्ष सिताराम गायकर यांनी सुधारणांचा शब्द दिला आहे. आमदार डॉ. किरण लहामटे व सुनीताताई भांगरे यांच्या उपस्थितीत एकजुटीची ग्वाही देण्यात आली.

**- उत्कर्षा रुपवते, प्रदेश प्रवक्त्या, वंचित बहुजन आघाडी**



# स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा ८० वा ध्वजारोहण सोहळा श्रीरामपूर नगरपालिकेच्या शाळा क्रमांक २ मध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते विजय शेलार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी श्रीरामपूर नगरपालिका महिला व बालकल्याण समितीच्या सभापती मंजुश्रीताई मुरकुटे, नगरसेवक संजय गांगड, शिक्षक नेते नवनाथ अकोलकर, माजी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शहानूर सय्यद, अशोक कानडे, प्रकाश माने, फारुकभाई शाह, पोपटराव वाकचौरे, लता औटी, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व पालक उपस्थित होते. श्रीरामपूर नगरपालिकेच्या पेन्शनर शिक्षकांच्या वतीने शाळेतील पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना दप्तर व खाऊचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. दप्तर वाटप उपक्रमासाठी असगरअली सय्यद, अजय शिंदे, ताराचंद पगारे, अशोक कानडे, अलका कुर्हे, रजनी कर्डिले व सुरेखा डांगे यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक सचिन शिंदे, दिपाली शेळके, अंगणवाडी सेविका कोठेकर, उदमले, छंदवर्ग शिक्षिका कणगरे व भोसले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सचिन शिंदे यांनी, तर आभार दिपाली शेळके यांनी मानले.



# स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपणाचा संदेश

## झाडे संवर्धनाची विद्यार्थ्यांनी घेतली शपथ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** स्वातंत्र्यदिनानिमित्त उंदीरगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळेत ध्वजारोहण, वृक्षारोपण आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रध्वज वाटप करून स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. समाजसेवक तथा वृक्षसंवर्धन समितीचे संस्थापक बाबासाहेब सोनवणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

मुख्याध्यापिका रजनी दयानंद खंडागळे व शिक्षिका लिना भूषण देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमात विद्यार्थी, पालक व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. बाबासाहेब सोनवणे यांनी सांगितले की, स्वातंत्र्यदिन केवळ ध्वजारोहणापुरता मर्यादित न राहता वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनातूनही देशसेवेची भावना जपली पाहिजे. ग्रामीण भागातील वाड्या-वस्त्यांचा विकास, शाळा, रस्ते आणि पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. पक्षी व वन्यप्राण्यांविषयी नागरिकांमध्ये प्रेम निर्माण करण्याची गरज आहे.नीम, चिंच, जांभूळ, वड, पिंपळ आणि उंबर यांसारखी झाडे मोठ्या प्रमाणात लावून त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन त्यांनी केले. वाड्या-वस्त्यांवरील जुने वटवृक्ष ही सामूहिक संपत्ती असून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी नागरिकांची आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी 'झाडे लावा, वृक्षसंवर्धन करा आणि भ्रष्टाचार नष्ट करा' अशी शपथ घेतली. सोनवणे यांनी सर्व सहभागींचे अभिनंदन केले. लिना देवरे यांनी आभार मानले.



# धनगरवाडी अखंड हरिनाम सप्ताहाच्या पूर्वतयारीचा आ. कोल्हेंनी घेतला आढावा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वाकडी :** राहाता तालुक्यातील श्रीक्षेत्र धनगरवाडी येथे योगीराज सद्गुरू गंगागिरीजी महाराज यांच्या १७९ व्या अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन १८ ते २५ ऑगस्टदरम्यान करण्यात आले आहे. 'वारकऱ्यांचा महाकुंभ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या सप्ताहाच्या पूर्वतयारीचा आमदार विवेक भैय्या कोल्हे यांनी सप्ताहस्थळी भेट देऊन आढावा घेतला.

यावेळी त्यांनी सप्ताह कमिटीच्या पदाधिकाऱ्यांशी संवाद साधून विविध कामांची माहिती घेतली. तसेच ज्येष्ठ नागरिक, पंचक्रोशीतील ग्रामस्थ व भाविकांशी चर्चा करून त्यांच्या सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या.



सप्ताहासाठी महाराष्ट्राच्या विविध भागांतून लाखो भाविक व वारकरी धनगरवाडी येथे दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियोजन, आरोग्य व आपत्कालीन वैद्यकीय सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा आमदार कोल्हे यांनी घेतला.

सद्गुरू योगीराज श्री गंगागिरीजी महाराज यांच्या प्रेरणेने मागील १७८ वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही भक्तीपरंपरा यंदा १७९ व्या वर्षात पदार्पण करत आहे. सप्ताह भक्तिमय, सुरक्षित व शिस्तबद्ध वातावरणात पार पडण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याची ग्वाही आमदार कोल्हे यांनी दिली.

यावेळी श्रीक्षेत्र धनगरवाडी व पंचक्रोशीतील ग्रामस्थांच्या वतीने आमदार कोल्हे यांचा सन्मान करण्यात आला. सप्ताह कमिटीचे पदाधिकारी, भाविक व ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# कमलपूर येथील जप्त केलेला १०० ब्रास मुरुम अखेर शिव रस्त्यांसाठी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** कमलपूर येथील जप्त केलेला १०० ब्रास मुरूम अखेर महसूल विभागाने कमलपूर येथील रस्ते व शिव रस्त्यांचे खड्डे बुजवण्यासाठी दिला आहे. यामुळे अवैधरित्या वाहतूकतुक करून वाळू मुरूम साठे बाजी करण्यावर आळा बसेल याबद्दल ग्रामपंचायत व ग्रामस्थ यांनी महसूल विभागाचे आभार मानले आहे. श्रीरामपूर तालुक्यातील कमलपूर येथे चक्रधर स्वामी मंदिराच्या पलीकडे भामाठाण रोड लगत अज्ञात इसमानी ९० ते १०० ब्रास मुरूम टाकला असल्याचे माहिती महसूल विभागाला मिळाली त्यावरून महसूल विभागाचे तहसीलदार मिलिंद कुमार वाघ यांनी कर्मचारी समवेत पंचनामा करून सदर मुरूम जप्त केला. सदर ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील रस्ते व शिव रस्ते यांना मोठ्या प्रमाणात खड्डे पडले



आहेत.

ते खड्डे बुजवण्यासाठी तहसीलदार यांना खड्डे बुजवण्यासाठी मुरमाची मागणी केली. त्यावर तहसीलदार यांनी जप्त केलेला १०० ब्रास मुरूम ग्रामपंचायत प्रशासनासाठी रस्ते व शिवरस्तेसाठी हा मुरम रस्त्यासाठी रीतसर देऊ केला आहे.या मुळे अवैधरित्या वाहतूकतुक करून वाळू मुरूम यांची साठे बाजी करण्यावर आळा बसेल. यासाठी सरपंच स्वाती मुरकुटे, तंटामुक्तीचे अध्यक्ष भास्करराव मुरकुटे, माजी सरपंच सचिन मुरकुटे उपसरपंच ललिता गोरे, अनिल गोरे, रमेश मुरकुटे, दिलीप मुरकुटे ग्राम. सदस्य राहुल बारस्कर, किरण गोरे, नंदु शिरसाठ , दिगंबर बारस्कर, सर्व सदस्य व ग्रामस्थ यांच्या वतीने तहसीलदार यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## आयटीआय राहाता येथील ६८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहाता :** शिर्डी साई रुरल इन्स्टिटयूट संचलित आयटीआय कॉलेज, पिंपळस (राहाता) येथे आयोजित रोजगार मुलाखतीत १०४ विद्यार्थ्यांपैकी तब्बल ६८ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली. धूत ट्रान्समिशन, संभाजीनगर येथे ५१, तर यशोदा इंडस्ट्रीज, अहिल्यानगर येथे १७ विद्यार्थ्यांची निवड झाली. या रोजगार मेळाव्यात फिटर, वेल्डर, इलेक्ट्रिशियन, वायरमन, मोटार मेकॅनिक, डिझेल मेकॅनिक तसेच कॉम्प्युटर ऑपरेटर या ट्रेडमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. धूत ट्रान्समिशनचे मॅनेजर रफिक मिर्झा, अजय भिवसने तसेच यशोदा इंडस्ट्रीजचे श्रीमंत बसाटे यांनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.

धूत ट्रान्समिशनच्या माध्यमातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना एक वर्षासाठी अप्रेंटिस तसेच काहींना ट्रेनी म्हणून कामाची संधी मिळणार आहे. अप्रेंटिस कालावधीत चांगले मानधन देण्याबरोबरच कंपनीकडून राहण्याची व भोजनाची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे रफिक मिर्झा यांनी सांगितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कौशल्य प्रशिक्षणासोबत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या प्रयत्नांना या निवडीमुळे यश मिळाले आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे, शालिनीताई विखे पाटील, डॉ. सुजय विखे, धनश्रीताई विखे व डॉ. प्रदीप दिघे यांनी अभिनंदन केले. ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाचे सुभाष गोरडे यांनी सूत्रसंचालन, तर दिलीप डांगे यांनी आभार मानले.

## विद्यार्थ्यांच्या मनातील सैनिकांप्रतीची कृतज्ञता थेट सीमेवरील जवानांपर्यंत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर श्रीरामपूर येथील भाजप महिला मोर्चा उत्तर जिल्हा सरचिटणीस तथा कौशल्य प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. पूजा हर्षद चव्हाण यांनी अनोखा आणि भावनिक उपक्रम राबविला.

शहरातील शा. ज. पाटणी विद्यालयात आयोजित या उपक्रमात तब्बल १९५ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी देशाच्या सीमेवर कर्तव्य बजावणाऱ्या सैनिकांप्रती आपल्या मनातील कृतज्ञता, भावना आणि शुभेच्छा स्वतःच्या शब्दांत कागदावर व्यक्त केल्या.

विद्यार्थ्यांनी लिहिलेली ही पत्रे व संदेश पूजा चव्हाण यांच्या माध्यमातून पोस्टाद्वारे सीमेवरील जवानांपर्यंत पाठविण्यात येणार आहेत. देशाच्या सुरक्षेसाठी कुटुंबापासून दूर राहून अहोरात्र सेवा करणाऱ्या सैनिकांप्रती विद्यार्थ्यांच्या मनात कृतज्ञतेची भावना निर्माण व्हावी, तसेच देशभक्तीची जाणीव अधिक दृढ व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

या उपक्रमाचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या भावना थेट सीमेवरील जवानांपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी व्यक्त केलेल्या या भावना देशाच्या रक्षणासाठी समर्पित जवानांच्या कार्याला मनापासून सलाम करणाऱ्या ठरत आहेत.

## द•ख•ल

### नागपंचमीच्या निमित्त विद्यार्थ्यांना सर्पसाक्षरतेचा धडा




**प्रवरानगर :** नागपंचमीच्या निमित्ताने सापांविषयीची भीती, गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याच्या उद्देशाने विद्या विकास पब्लिक स्कूल, बाभळेश्वर येथे सर्पजागृतीपर उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. इयत्ता एल.के.जी. ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना सर्पमित्र अजय बोधक आणि आर्यन गायकवाड यांनी विषारी व बिनविषारी सापांची ओळख आणि त्यांच्या जीवनातील महत्त्व याबाबत मार्गदर्शन केले. मानवी वस्तीजवळ आढळणाऱ्या प्रमुख विषारी सापांमध्ये नाग, मण्यार, घोणस आणि फुरसे यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी संस्थेचे सचिव आण्णासाहेब म्हस्के पाटील यांच्या हस्ते सर्पमित्र अजय बोधक व आर्यन गायकवाड यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

### राजेंद्र आठरे यांची राज्य कर निरीक्षकपदी निवड



**बालाजी देडगाव :** देडगाव येथील राजेंद्र आजिनाथ आठरे यांची राज्य कर निरीक्षकपदी (डढख) निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी आकांक्षा विनोद तांबे यांना 'सह्याद्री रत्न' पुरस्कार मिळाल्याबद्दल, तर उद्धव राजेंद्र एडके यांची रेल्वे क्लर्कपदी निवड झाल्याबद्दल गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जनार्दन मुंगसे होते. सेवानिवृत्त आदर्श शिक्षक भाऊसाहेब सावंत यांनी प्रास्ताविक केले. विविध मान्यवरांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. राजेंद्र आठरे यांनी आपल्या यशात वांडेकर गुरुजी वाचनालय, आई-वडील व भावंडांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. आठ वर्षांच्या संघर्षानंतर मिळालेले यश ग्रामस्थांच्या सन्मानामुळे अधिक प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास ग्रामस्थ, युवक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रायझिंग स्टार स्कूल ऐनतपूर - बेलापूर येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात




**ऐनतपूर :** बेलापूर येथील रायझिंग स्टार स्कूलमध्ये १५ ऑगस्ट रोजी ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण प्रणाली भगत, मा. सरपंच, ग्रामपंचायत बेलापूर खुर्द यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, भाषणे व विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमास ड. शाळीग्राम होडगर साहेब यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळेच्या संचालिका हर्षला भावसार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डमाळे एच. डी, योगिता पांढरे, रोहिणी वाघस्कर, शितल जैन, कल्याणी शिरसाठ, ज्योती भडके, अर्चना शेंडगे, प्रतीक्षा सूर्यवंशी, वृंदा बेलसरे, माधुरी बावचे, निर्मला खोसे, किरण गायकवाड व जितू कार्ले यांनी विशेष परिश्रम घेतले.

### बोरबने शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रूपाली गायकवाड



**पुणतांबा :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बोरबने आखाडा शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी रूपाली महेश गायकवाड, तर उपाध्यक्षपदी कडू भाऊसाहेब जेजुरकर यांची एकमताने निवड झाली. शाळेतील इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला. विद्यार्थ्यांना शिक्षिका ज्योती कदम व प्रीती भोईर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

खासदार निधीतून मिळालेल्या इंटरक्टिव्ह बोर्डचा प्रश्नपत्रिका सरावासाठी उपयोग झाल्याने विद्यार्थ्यांना मोठा फायदा झाला. पालकांच्या लोकसहभागातून प्रत्येक विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती परीक्षेची मार्गदर्शिका उपलब्ध करून देण्यात आली. स्वातंत्र्य दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. माजी विद्यार्थी वर्गाने 'मिशन आपुलकी' उपक्रमांतर्गत शाळेच्या रंगकामासह डिजिटल फलक, कपाट आदी साहित्य देऊन सहकार्य केले.

## पीव्हीपी सैनिक स्कूलचे थलेटिक्समध्ये नेत्रदीपक यश

### २० पदकांसह ११ खेळाडू राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी :** थलेटिक्स फेडरेशन ऑफ इंडिया (AFI) आयोजित जिल्हास्तरीय थलेटिक्स स्पर्धेत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, लोणीच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत तब्बल २० पदकांची कमाई केली. यात ८ सुवर्ण, ६ रौप्य आणि ६ कांस्य पदकांचा समावेश असून, ११ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. राज्यस्तरीय स्पर्धा देरवण, रत्नागिरी येथे होणार आहे. प्रणव दिलीप पाटील याची पेंटॅथलॉन, आयुष किरण एखंडे याची हॅमर थ्रो, योगेश विष्णू जाधव याची ४०० मीटर हर्डल्स व स्टीपलचेस, अथर्व संदीप खापरे याची हेप्टॅथलॉन आणि सक्षम महेश सुकाळे याची ११० मीटर हर्डल्ससाठी निवड झाली.



बिशालकुमार पृथ्वीराज भारती याची ४०० व ११० मीटर हर्डल्स, भूषण करभारी ढोबळे व रुद्रप्रताप भागवत जाधव यांची लांब उडी, पार्थ पांडुरंग कोल्हे व यश जालंधर भोमले यांची उंच उडी, तर आदित्य कुमार सिंह याची ६० व ६०० मीटरसाठी निवड झाली. या यशामुळे शिक्षणासोबतच शारीरिक तंदुरुस्ती, क्रीडा कौशल्य आणि सर्वांगीण विकासाला शाळेत दिले जाणारे महत्त्व अधोरेखित झाले आहे. प्रशिक्षकांचे मार्गदर्शन व शिक्षकवृंदाच्या मेहनतीमुळे हे यश मिळाल्याचे प्राचार्य राजेश माघाडे यांनी सांगितले. कमांडंट कर्नल सुभाष घोडगेरी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनीही पदकविजेत्यांचे कौतुक केले.

## निझर्णेश्वर मंदिराच्या विकासाचा मार्ग मोकळा करणार : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**संगमनेर :** कोकणगाव येथील श्री निझर्णेश्वर मंदिर परिसर वनविभागाच्या हद्दीत असल्याने विकासकामांमध्ये निर्माण होणाऱ्या कायदेशीर अडचणी दूर करून मंदिराच्या विकासाचा मार्ग मोकळा केला जाईल, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली. वनविभागाची जागा मंदिर परिसरासाठी उपलब्ध करून घेण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. श्रावणातील पहिल्या सोमवारनिमित्त आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते श्री निझर्णेश्वर मंदिरात अभिषेक, पूजा व आरती करण्यात आली. यानंतर भाविकांना मार्गदर्शन करताना आ. खताळ बोलत होते.

मंदिराची वास्तू जुनी झाल्याने भाविक, ग्रामस्थ व देवस्थान ट्रस्टच्या सहमतीने मंदिराचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाविकांचे योगदान, ग्रामस्थांचे सहकार्य आणि शासनाची मदत यांच्या समन्वयातून हे काम पूर्ण केले जाणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. पुढील वर्षीच्या श्रावण महिन्यापर्यंत नवीन मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण करून शिवभक्तांना नव्या मंदिरात दर्शनाचा लाभ देण्याचा प्रयत्न आहे. विकासकामांसोबत भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर राहील. मंदिराचे धार्मिक महत्त्व व परिसराचे सौंदर्य जपून विकास केला जाईल, असे आ. अमोल खताळ यांनी स्पष्ट केले. यावेळी देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी, ग्रामस्थ, शिवभक्त व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चिलेखनवाडी शाळेतील दहा विद्यार्थ्यांना 'सुर्यमणी'चा शैक्षणिक आधार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कुकाणा :** नेवासा तालुक्यातील चिलेखनवाडी येथील सुर्यमणी जनकल्याण सेवा संस्थेने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सर्वसामान्य व आदिवासी कुटुंबातील दहा विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षासाठी दत्तक घेतले. या विद्यार्थ्यांचा संपूर्ण वर्षाचा शैक्षणिक खर्च संस्था करणार असल्याने संस्थेच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. चिलेखनवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सेवानिवृत्त माजी सैनिकाच्या पत्नी रेणुका गुंजाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस पाटील मंगल सावंत होत्या. विद्यार्थ्यांनी कवायत तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी सुर्यमणी जनकल्याण सेवा संस्थेचे उपाध्यक्ष सुनील सावंत, सदस्य राजेंद्र कांबळे, जॉय गजभिव, सरपंच भाऊसाहेब सावंत, सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर खंडागळे, सेवानिवृत्त मंडल अधिकारी रमेश सावंत, उपसरपंच नाथा गुंजाळ, प्रा. लक्ष्मण लोखंडे, देविदास सावंत, अध्यापिका शुभांगी क्षिरसागर, अश्विनी कदम आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक सुरेश सानप यांनी प्रास्ताविक करून शाळेच्या वार्षिक अहवालाचे वाचन केले. सुनील सावंत यांनी दहा विद्यार्थ्यांना दत्तक घेतल्याची घोषणा केली. संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटपही करण्यात आले. कार्यक्रमासाठी ग्रामस्थ, विद्यार्थी व विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अंबादास चंदन यांनी आभार मानले.

## नागापूर येथे नागपंचमीनिमित्त हजारो भाविकांनी घेतले नागनाथाचे दर्शन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील नागापूर येथील प्राचीन नागनाथ मंदिरात नागपंचमी व श्रावणी सोमवारनिमित्त हजारो भाविकांनी दर्शन घेतले. नागपंचमीच्या यात्रेनिमित्त मंदिर परिसरात दिवसभर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. नागापूर हे प्राचीन गाव असून येथे नागदेवतेचे जुने मंदिर आहे. मंदिरातील दगडावर 'गाईचे खूर, सशाचे उर, सात कढाई नागापूर' अशी कोरीव शिल्पे असल्याचे सामाजिक कार्यकर्ते काकासाहेब काळे यांनी सांगितले. नागनाथ देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांच्या प्रयत्नांतून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला असून भव्य सभामंडप व सुशोभित पटांगण उभारण्यात आले आहे. नागनाथ प्रतिष्ठानच्या वतीने तसेच निवृत्ती काळे यांच्या प्रयत्नातून मंदिर परिसराला नवे स्वरूप मिळाले आहे. मंदिराला प्राचीन बारवही असून सध्या त्यात पाणी नसल्याने तिचा वापर होत नसल्याचे सांगण्यात आले. नागपंचमी यात्रेनिमित्त आ. विठ्ठलराव लंघे, डॉ. अशोकराव ढगे, माजी सभापती सुनीताताई गडाख, माजी आ. पांडुरंग अभंग, बाळासाहेब मुरकुटे, ज्येष्ठ नेते काशिनाथअण्णा नवले, निर्मला ढगे, ड. स्मिताताई लवांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व संत-महंतांनी मंदिराला भेट दिली. यात्रेत विविध दुकाने थाटण्यात आल्याने मंदिर परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. पुरातत्त्व विभागाचे मंत्री आशिष शेलार यांनी मंदिराला भेट देऊन विकासासाठी मार्गदर्शन करावे, अशी अपेक्षा डॉ. अशोक ढगे यांनी व्यक्त केली.

## सत्यजित कदमांचा त्याग वाया जाणार नाही : डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** गेल्या १० वर्षांपासून पक्षाचा आदेश मानून सत्यजित कदम यांनी केलेला त्याग व घेतलेली भूमिका वाया जाऊ देणार नाही, हा माझा शब्द आहे. देवळाली प्रवरा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून येत्या काळात विकासाची गंगा आणली जाईल, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे यांनी केले. देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्यावतीने राहुरी फॅक्टरी येथील वृंदावन कॉलनीत उभारण्यात आलेल्या जलतरण तलावाचा तसेच आधुनिक सक्शन कम जेटिंग मशीनचा लोकार्पण सोहळा शनिवारी सकाळी डॉ. विखे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार चंद्रशेखर कदम होते. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष सत्यजित कदम, उपनगराध्यक्षा बेबीताई बर्डे,




मुख्याधिकारी ऋषिकेश पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे यांच्यासह नगरसेवक, अधिकारी, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. सुजय विखे म्हणाले की, सत्यजित कदम आणि माझा स्वभाव आक्रमक असला तरी राजकारणात आक्रमक स्वभाव असणे गरजेचे आहे. सोशल मीडिया आणि व्हिडिओच्या माध्यमातून टीका करणारे अनेक जण आहेत; मात्र त्याकडे दुर्लक्ष करून कामातून उत्तर देणारी माणसे आम्ही आहोत. आज जिल्ह्यात केवळ अहिल्यानगर महानगरपालिकेचा स्वतःचा जलतरण तलाव आहे.

मात्र 'क' वर्ग नगरपालिकांमध्ये जिल्ह्यात देवळाली प्रवरा नगरपरिषदेने जलतरण तलाव उभारला, ही निश्चितच कौतुकास्पद बाब आहे. जलतरण तलावाची बांधणी व व्यवस्था उत्तम असल्याचेही त्यांनी नमूद केले. देवळाली प्रवरा शहरातील विकासकामांसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून भरीव निधी उपलब्ध करून देण्यासाठी आपण स्वतः आग्रही राहू, अशी ग्वाहीही डॉ. विखे यांनी दिली. या कार्यक्रमास उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे, नगरसेवक प्रकाश संसारे, अजित चव्हाण, अमोल कदम, सौरभ मुसमाडे, बाळासाहेब लोखंडे, दासू पठारे, शरद वाळुंज, सचिन शेटे, ऋषभ लोढा, सुजाता कदम, सुर्वणा कोठुळे, सिंधुताई वाळुंज, आशाताई चव्हाण, मनीषा कदम, सीमा देठे, जयश्री खांदे, चंदाराणी गाडे, पुष्पा तांबे,ठेकेदार ऋषिकेश कदम आदिंसह देवळाली सोसायटीचे आजी माजी पदाधिकारी, शहरातील नागरिक व कार्यकर्ते तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गटनेते प्रकाश संसारे यांनी केले, तर आभार अमोल कदम यांनी मानले.

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२३२/२०२६
नेवासा दिनांक. १३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- आयाज कलंदर शेख, सलाबतपुर, ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. रेश्मा आयाज शेख, रा.सलाबतपुर, ता.नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव- रेश्मा आयाज शेख, गावाचे नाव-सलाबतपुर, जन्म दिनांक-१८/०५/१९९७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

### जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२४३/२०२६
नेवासा दिनांक. १३/०८/२०२६

अर्जदार श्री/श्रीम- युनुस अब्दुल रहेमान नाईकवाडी रा. नेवासा खुर्द ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. युनुस अब्दुल रहेमान नाईकवाडी रा. नेवासा खुर्द यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे.

सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.१, जन्म नोंद घेण्यात येणा-या व्यक्तीचे नाव- युनुस अब्दुल रहेमान नाईकवाडी, गावाचे नाव-नेवासा खुर्द, जन्म दिनांक-१२/१०/१९६७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी ज़न्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

# पुणे-अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण

## खा. नीलेश लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड समोर आली असून, पुणे-अहिल्यानगर या १३४ किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाला आहे. तसेच या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (उ्झठ) तयार करण्यात आला आहे. दुसरीकडे, छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर या ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी ऋङडला मंजुरी मिळाली आहे. या दोन्ही प्रकल्पांसाठी खासदार नीलेश लंके यांनी २०२४ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यामुळे महत्त्वाचे यश मिळाल्याचे मानले जात आहे.

खासदार म्हणून निवडून आल्यानंतर लंके यांनी अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न सातत्याने केंद्र सरकारच्यापातळीवर लावून धरला. केवळ पत्रव्यवहारापुरता पाठपुरावा न करता लोकसभेच्या सभागृहात अनेकदा या मागणीला वाचा फोडली. तसेच रेल्वे मंत्रालयाशी संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या बैठकींमध्ये सक्रिय सहभाग घेत प्रकल्पांची सद्यस्थिती, सर्वेक्षण, डी पी आर आणि पुढील कार्यवाहीचा आढावा घेतला.



पुणे-अहिल्यानगर रेल्वेमार्गाचे अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण होणे हा प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. सर्वेक्षण पूर्ण झाल्याने प्रकल्पाच्या प्रशासकीय व मंजुरी प्रक्रियेला पुढे जाण्यास आवश्यक असलेली दिशा स्पष्ट झाली आहे. या मार्गामुळे अहिल्यानगरला पुणे शहराशी अधिक सक्षम रेल्वे संपर्क मिळण्यास मदत होणार आहे.

त्याचबरोबर छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर ११० किलोमीटरच्या नवीन रेल्वेमार्गासाठी अंतिम स्थान सर्वेक्षणाला मंजुरी मिळाल्याने या प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेलाही गती मिळण्याची अपेक्षा आहे. अंतिम स्थान सर्वेक्षणच्या आधारे पुढील टप्प्यात डीपीआर आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

खासदार निलेश लंके म्हणाले, अहिल्यानगरच्या रेल्वे कनेक्टिव्हिटीचा प्रश्न हा केवळ वाहतुकीचा विषय नसून जिल्ह्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाशी निगडित आहे. २०२४ मध्ये खासदार झाल्यापासून पुणे-अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर रेल्वेमार्गांसाठी सातत्याने पाठपुरावा करत आहे. लोकसभेत हा विषय अनेक वेळा मांडला तसेच संबंधित बैठका आणि रेल्वे समितीच्या माध्यमातून या प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेतला. पुणे-अहिल्यानगर रेल्वेमार्गाचा अंतिम स्थान सर्वेक्षण पूर्ण झाल्याची आणि छत्रपती संभाजीनगर-अहिल्यानगर रेल्वेमार्गाच्या अंतिम स्थान सर्वेक्षणला मंजुरी मिळाल्याची माहिती अहिल्यानगरच्या जनतेसाठी समाधानाची बाब आहे. मात्र, हा प्रवास येथे थांबणार नाही. प्रत्यक्ष रेल्वेमार्गाचे काम सुरू होऊन त्याचा लाभ जनतेला मिळेपर्यंत पाठपुरावा सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अहिल्यानगरच्या रेल्वे विकासासाठी इतर महत्त्वाचे प्रकल्पही सुरू आहेत. दौंड-मनमाड २३६ किलोमीटर रेल्वेमार्गाचे दुहेरीकरण पूर्ण होऊन ते कार्यान्वित झाले आहे.

# द•ख•ल



## सर्पमित्राने पकडलेल्या नागाची विधीवत पूजा

**अहिल्यानगर :** नागपंचमीच्या पार्श्वभूमीवर सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी सुरक्षितपणे पकडलेल्या नागाची नागपंचमीनिमित्त विधीवत पूजा करण्यात आली. नागदेवतेप्रती श्रद्धा व्यक्त करताना नागरिकांनी मोठ्या उत्साहात या पूजेत सहभाग घेतला. परिसरात आढळलेल्या नागाला सर्पमित्र कृष्णा पाटील बेरड यांनी कोणतीही इजा न पोहोचवता कौशल्याने पकडले. नागपंचमीच्या दिवशी या नागाची पारंपरिक पद्धतीने पूजा करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी नागदेवतेचे दर्शन घेतले आणि सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली त्यानंतर सर्पाला निसर्गात मुक्त करण्यात आले. दरम्यान, साप दिसल्यास घाबरून त्याला मारू नये, तर सर्पमित्र किंवा संबंधित वन्यजीव बचाव पथकाशी संपर्क साधावा, असे आवाहन कृष्णा पाटील बेरड यांनी केले. साप हा पर्यावरणातील महत्त्वाचा घटक असून, त्याचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.



## शिराळ येथील जि. प. प्राथमिक दत्त क्लास शाळेत स्वातंत्र्य दिन साजरा

**शिराळ :** भारतीय स्वातंत्र्य दिनाचा उत्सव आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दत्त क्लास शिराळ येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या निमित्ताने शाळेत विविध शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दारकुंडे सर हे होते. स्वातंत्र्य दिनाचे विद्यार्थ्यांची उत्कृष्ट भाषणे आणि शिस्तबद्ध संगीत कवायतीने उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमासाठी बाळासाहेब गडाख, मोहन गोरे, भाऊसाहेब मुळे, चांगदेव तुपे, आंबिर शेख, रामदास गोरे, शंकर वाघ, पाटीलबा गायके, सिताराम गायके यांसह अनेक ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.

## चिचोंडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर येथे दिनांक१८ ऑगस्ट २०२६ पासूनतीन दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह हरेश्वर संस्थानचे मठाधिपती ह भ प भगवान महाराज मचे,यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह सुरू होत असून सकाळी काकडा हरिपाठ संध्याकाळी सात ते नऊ या कालावधीत ह भ प सौ मयुरी ताई जाधव यांचे कीर्तन १९ ऑगस्ट २०२६ रोजी संध्याकाळी सात ते नऊ या कालावधीत ह भ प गोरक्षनाथ भवर यांचे कीर्तन २० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत ह भ प भगवान महाराज मचे,यांचेकाल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाची भव्य पंगत होणार आहे तरी चिचोंडी व परिसरातील भाविकांनी या शब्दाचा लाभ घ्यावा अस आवाहन,दत्त तरुण मंडळ यांनी केले आहे.

## धनादेश अनादर प्रकरणात आरोपीस सहा महिने कारावास; साडेचार लाखांचा दंड

**श्रीगोंदा :** कर्जफेडीसाठी दिलेला धनादेश अनादरित झाल्याच्या प्रकरणात श्रीगोंदा येथील फौजदारी न्यायालयाने आरोपी विनोद झुंबर बारवकर यांना सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच न्यायालयाने ४ लाख ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. तालुक्यातील काष्टी येथील साईसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित यांच्याकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीसाठी आरोपीने धनादेश दिला होता. मात्र, संबंधित धनादेश अनादरित झाल्यानंतर पतसंस्थेच्या वतीने न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली होती. या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायाधीश प्रवीण व्ही. पाटील यांनी नुकताच निकाल जाहीर केला.न्यायालयाने आरोपीस सहा महिन्यांच्या कारावासासह ४ लाख ५० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली असून, आरोपीविरुद्ध अटक वॉरंट काढण्यात आले आहे.या प्रकरणात साईसेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित काष्टीच्या वतीने शिवाजी संभाजी श्रीराम, प्रशासकीय अधिकारी महेंद्र घोडके व मुंडे यांनी कामकाज पाहिले. पतसंस्थेच्या वतीने ॲड. प्रवीण बी. क्षीरसागर व ॲड. प्रमिला ए. पाटील यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले.

# शेवगाव नगरपरिषदेच्या तब्बल १ कोटी ९० लाखांच्या विकासकामांचे भूमिपूजन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** शेवगाव शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या तब्बल १ कोटी ९० लाख रुपयांच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. माया अरुण मुंढे यांच्या शुभहस्ते तसेच शिवसेनेचे नेते अरुण मुंढे ज्येष्ठ नेते,श्री. अरुण पाटील लांडे,नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीमती विजया गाडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.



नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील विविध प्रभागांमध्ये रस्ते, उद्यान आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ही कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये प्रभाग क्रमांक ११ मधील गट क्रमांक ७८५ येथे ९९ लाख ७७ हजार ६७१ रुपये निधीतून 'नमो उद्यान' विकसित करण्यात येणार आहे. तसेच प्रभाग क्रमांक १२ मधील आखेगाव रोड ते झिरपे घर रस्ता काँक्रिटीकरणासाठी २४ लाख ९३ हजार ९२२ रुपये, प्रभाग क्रमांक ३ मधील म्हसोबा नगर अंतर्गत रस्ता सिमेंट काँक्रिटीकरणासाठी ९ लाख ९८ हजार ५७६ रुपये, प्रभाग क्रमांक ३ मधील गायकवाड घर ते कवडे घर रस्ता भराव व खडीकरणासाठी ९ लाख ९६ हजार ८७७ रुपये, तर प्रभाग क्रमांक ८ मधील दोन रस्त्यांच्या सिमेंट काँक्रिटीकरणासाठी अनुक्रमे २४ लाख ९८ हजार ८२७ रुपये आणि १३ लाख १४ हजार ६४९ रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे.

याप्रसंगी मराठे साहेब, जाधवर साहेब, सुनील घुले तसेच मा.एजाजभाई काझी, अमोल सागडे, प्रेमभाऊ जाजू, राजूभाऊ तरटे, एकनाथ कुसळकर, विठ्ठल फडके, दहिफळे साहेब, सतीशभाऊ मगर, नगरसेवक कमलेश गांधी, संजूभाऊ फडके, निलेश रोकडे, नंदकुमार मुंढे, अजिंक्य लांडे, रिजवान शेख, नितीन दहिवाळकर, विनोद मोहिते, ज्ञानेश्वर लिंगे, बाबासाहेब लांडे, अजय भारस्कर, शब्बीरभाई शेख, अमर शेख, ॲड. शामभाऊ कंनगरे, भूषण देशमुख, नितीन फुंदे, सुनील जगताप, अभय पालवे, विशाल आव्हाड, कानिफ साखरे, आदित्य नाईक, सोमा मोहिते, रोहन फडके, नानाभाऊ कर्डिले, संपत घुगे, अंकुश ढाकणे, इंजि.सोमनाथ शिंदे,अभिषेक गालफाडे यांच्यासह स्थानिक महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीनागेश्वर पालखी सोहळा जामखेडला संपन्न

## मुस्लिम पंच कमिटीच्यावतीने पालखीचे स्वागत

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** भक्तिमय वातावरणात वारकरी परंपरेनुसार टाळ मृदुंगाच्या जयघोषात जामखेडला सोमवारी श्रीनागेश्वर पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. यावर्षी महिलांची संख्या लक्षणीय होती. शुध्द वारकरी परंपरेने हा पालखी सोहळा संपन्न झाला.



जामखेडचे ग्रामदैवत श्रीनागेश्वरची नागपंचमीच्या निमित्ताने यात्रा असते.गेल्या २३ वर्षापासून यानिमित्ताने श्रीनागेश्वर पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. सोमवारी सकाळपासूनच येथे मोठ्या उत्साहाचे वातावरण होते. सकाळी शिवलीलामृत पारायण झाले. यजमान जामखेडच्या नगराध्यक्षा सौ. प्रांजलताई अमित चिंतामणी व श्री अमित शेठ चिंतामणी तसेच श्री. गोवर्धन जोरे व सौ. मंगलाताई जोरे यांच्या हस्ते भगवान श्रीनागेश्वराची विधीवत पुजा झाली. दरम्यान पंचक्रोशीतील सर्व भजनी मंडळांनी मंदिरासमोर भजन सुरू केले. यावेळी एकच जयजयकार झाला ही पालखी रथामध्ये ठेवण्यात आली नंतर हरहर महादेव , ओम नमः शिवाय ओम नमः शिवाय नागेश्वराय शिव नागेश्वराय व ज्ञानोबा तुकाराम च्या जयघोषात व पंचक्रोशीतील भजनी मंडळांच्या टाळ मृदुंगांच्या गजरात पालखी मिरवणुकीस सुरुवात झाली. श्रीनागेश्वर मंदिरापासून पालखी मिरवणूक सुरू झाली. श्रीनागेश्वर महाद्वारापासून खर्डा रस्ता, पुण्यश्लोक अहिल्यादेवी चौक, लक्ष्मी चौक, संविधान चौक, श्रीविठ्ठल मंदिर, छत्रपती शिवाजी महाराजपेठ, शनी मारुती मंदिर, जयहिंद चौक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज मार्ग, जुने कोर्ट, महादेव गल्ली मार्गे वैतरणा नदी तीरातून नव्याने निर्माण करण्यात आलेल्या पालखी मार्गावरून हा सोहळा पुन्हा श्रीनागेश्वर मंदिर येथे पोहोचला. कीर्तन मंडपात दिंडी पोहोचल्यानंतर हा अभंग घेण्यात आला व आरती करण्यात आली.

यावेळी, पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, मधुकर राळेभात, प्रदीप टाफरे, पोपट राळेभात, आकाश बाफना, मोहन पवार, संजय काशिद, राजेंद्र गोरे, प्रशांत राळेभात, पवन राळेभात, दिगंबर चव्हाण, मनोज कुलकर्णी, प्रविण चोरडिया,बजरंग डूचे, सचिन शिंदे, अमोल लोहकरे,शिवकुमार डोंगरे ड.महारूद्र नागरगोजे, राजेंद्र जाधव प्रा. ज्ञानदेव कुंभार, गणेश डोंगरे, संजीवन मेंढकर, भजनी मंडळाचे पंढरीनाथ महाराज राजगुरू, हरिदास गुंड, रावसाहेब कोल्हे, जगन्नाथ धर्माधिकारी, संतोष पाटील दादासाहेब महाराज सातपुते, आदी उपस्थित होते.

# रामगिरी बाबा टेकडी संरक्षणासाठी नागरिकांचा प्रशासनावर दबाव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहराच्या मध्यवर्ती असलेल्या रामगिरी बाबा टेकडीच्या नियमबाह्य उत्खननावरून शहरातील सर्व थरातील नागरिकांकडून पालिका प्रशासनाच्या मनमानी कारभाराविरुद्ध तीव्र नाराजी व्यक्त होत असून याबाबत राजकारण विरहित जागरूक नागरिक, विविध संस्था व संघटनांच्या सहभागातून जन आंदोलन आकाराला आले आहे. विकास नव्हे, हा तर विध्वंस...या नावाचे प्रसिद्धी पत्रक शहरभर वितरित झाले आहे. शहराच्या मध्यभागी सुमारे २५ हजार चौरस मीटर एवढ्या प्रचंड आकाराची उंच टेकडी असून टेकडीच्या मध्यभागी ग्रामदैवत रामगिरी बाबा यांची समाधी आहे, म्हणून या टेकडीला रामगिरी बाबा टेकडी असे नाव पडले. पूर्वी या टेकडीवर झाडी होती. नैसर्गिक मुरमाचा डोंगर असल्याने पावसाचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता या दगडामध्ये होती त्यामुळे शहरातील विविध आड, हातपंप यांना पाणी राहत असे. नळ योजनेच्या टाक्या या टेकडीवर उभारल्या गेल्या, त्यावेळी काही प्रमाणात उत्खनन झाले. त्यानंतर खुलेनाट्यगृहाचे कामही टेकडी चा भाग उकरूनच पूर्ण करण्यात आले. शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील लोकांना निवासी भूखंड देण्यात आले, त्यावेळी ही टेकडीचाच भाग कोरला गेला.



या रहिवाशांना शासनाने जागा दिली याचा अर्थ येथे राहता येऊ शकते असा समज करून घेत गेल्या ३०-४० वर्षात मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे होऊन सर्व बाजूंनी टेकडीचे पोस्टमार्टम झाले. दाट लोकसंख्येच्या मध्यभागी टेकडी असून टेकडीवरील सुमारे वीस लाख लिटरच्या पाण्याच्या टाक्या, मोठ्या विकास कामांचा राडा रोडा पडलेला आहे. उद्यानाचे काम करतानाही टेकडीचा पृष्ठभाग कोरण्यात आला होता. टेकडीच्या विद्रूपिकरणाबरोबरच शहरातील नागरिकांच्या जीवाला धोका झाला आहे. पालिकेने नियम धाब्यावर बसवून टेकडीच्या पायथ्याला खोदकाम करून मुरमाची सुद्धा विल्हेवाट लावली आहे. असा आरोप यापूर्वी सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी करत आंदोलने केली.

त्यानंतर शहरातील ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते माजी नगरसेवक डॉ. दीपक देशमुख यांनी या प्रश्नाचे गांभीर्य ओळखत शहरातील सर्व थरातील नागरिकांशी संवाद साधत जन आंदोलन उभारण्याचा निर्णय घेतला. या आंदोलनामध्ये कुठल्याही राजकीय पक्षाचे बॅनर नसून पालिका प्रशासनाची मनमानी, विकास कामातील गैरप्रकार, वृक्षारोपणाच्या नावाखाली झालेले गैरप्रकार, त्याचबरोबर रामगिरी बाबा टेकडीच्या अस्तित्वाशी खेळत विकास कामांचा मांडलेला बागुल बुवा याविरुद्ध आवाज उठवण्यासाठी पालिकेच्या इतिहासात प्रथमच जागरूक नागरिकांच्या पुढाकाराने संघटन आकाराला येत आहे.

निवेदना वर कुणाचे व्यक्तिगत अथवा संघटनेचे नाव नसले तरी याबाबत टेकडी बचाव कृती समितीचे निमंत्रक डॉ. दीपक देशमुख यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी छापलेल्या पत्रकाला दुजोरा देत आंदोलनाची तीव्रता व व्याप्ती एका बाजूने वाढवू तर दुसऱ्या बाजूने न्यायालयाचे लक्ष वेधू ,अशा पद्धतीने भूमिका मांडली. पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार नैसर्गिक टेकडीचे संवर्धन करणे बंधनकारक आहे.

# बी. बी. ए. आणि बी.सी.ए. प्रवेश प्रक्रियेला भरघोस प्रतिसाद




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महाराष्ट्र शासनाच्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या वतीने सन २०२६-२७ ची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असुन बी. बी. ए. व बी.सी.ए. या तीन आणी एम. बी. ए. व एम.सी.ए. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमाला आय. एम. एस. संस्थेत उत्तम प्रतिसाद - मिळत असल्याची माहिती प्रभारी संचालक डॉ. प्रणोती तेलोरे यांनी दिली. विद्यार्थ्यांचे स्वागत प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी संस्थेचे उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस, माजी संचालक डॉ. एम.बी.मेहता, कार्यालीन अधिक्षक महेश दीक्षित, लेखापाल नरेंद्र कदम, दिपक तुंगार, अश्विनी येळीकर, अनुश्री गुंफेकर, किरण साबळे, सी. डी. मोहिते, सॅम्यूअल उजागरे व इतर कर्मचारी उपस्थित होते. शासनाच्या निवड प्रक्रियेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रिया सोपी व्हावी म्हणून ऑनलाईन पध्दतीने सर्व सोपस्कार राबविले जातात. प्रवेश प्रक्रियेचा फॉर्म भरण्यापासुन फी भरे पर्यंत सर्व सुविधा ऑनलाईन आहेत. ही प्रकिया पुर्ण झाल्यानंतर प्रशासन विभागाच्या वतीने प्रक्रिया पूर्ण झाल्याचे पत्र, पुष्प, सॅक (बॅग) देऊन मुलांचे स्वागत केले जाते. प्रशासन विभागातील कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांसाठी एक हॅडआउट तयार केले आहे, जे आय. एम. एस. मधल्या त्यांच्या शैक्षणिक कार्यकाळात काय करावे याबाबत मार्गदर्शक सुचना देणारा आहे.

# श्रीगोंदा पीएचसी प्रकरणात दोघांना अटकेपासून संरक्षण

## उच्च न्यायालयाचा दिलासा; १५ हजारांच्या जातमुचलक्यावर अंतरिम जामीन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राशी संबंधित गुन्ह्यात तिळक गोईनाथ भोस व अन्य एका अर्जदाराला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दिलासा दिला आहे. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या खंडपीठाने १७ ऑगस्ट २०२६ रोजी सुनावणी करताना दोन्ही अर्जदारांना पुढील सुनावणीपर्यंत अटकेपासून संरक्षण दिले. एफआयआरचा प्रथमदर्शनी विचार करता अर्जदारांनी प्राथमिक आरोग्य केंद्राला कुलूप लावल्याचे दिसून येत नाही. तसेच कोणाला मारहाण किंवा धक्काबुक्की केल्याचा विशिष्ट आरोपही त्यांच्याविरुद्ध नसल्याचे न्यायालयाने नमूद केले. कथित शिवीगाळीबाबतही एफआयआरमध्ये स्पष्ट उल्लेख नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले.या प्रकरणात श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६९३/२०२६ दाखल असून, भारतीय न्याय संहितेतील कलम ७९, १२७(२), २२१, ३५१(२), ३५२ तसेच महाराष्ट्र मेडिकेअर सर्व्हिस पर्सन्स अँड मेडिकेअर सर्व्हिस इन्स्टिट्यूशन्स (हिंसाचार व मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध) अधिनियम २०१० मधील कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल आहे.अटक झाल्यास दोन्ही अर्जदारांना प्रत्येकी १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर व तेवढ्याच रकमेच्या एका जामीनदारावर जामीन देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलचे आरोग्य शिबिर रुग्णांसाठी पर्वणीच : मुथा

## स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे.या मोफत आरोग्य शिबिरात मुथा परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमधील शिबिराचे माध्यमातून सेवा करण्याची भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल ची कीर्ती सर्व दूर पसरली आहे. सध्या न परवडणारा औषधाचा खर्च यामूळे आनंदऋषीजी हॉस्पिटलचे आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी पर्वणीच ठरली आहे.असे प्रतिपादन उद्योजक चंद्रकांत मुथा यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२६ व्या जन्मदिना निमित्त स्त्री रोग व गर्भवती महिला आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन स्व.रतनचंद्रजी मुथा स्मरणार्थ शिबिराचे उद्घाटन उद्योजक चंद्रकांत मुथा वांबोरीकर,श्रीमती मीनाताई मुनोत यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले.याप्रसंगी आशिष मुथा, ज्योत्सनाताई मुथा,श्रद्धाताई बरमेचा आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, सतीश लोढा,माणकचंद कटारिया,डॉ.आशिष भंडारी, वसंत चोपडा शिबिराचे तज्ञ डॉ.रवींद्र मुथा,डॉ.कृतिका पाटील,डॉ.नीलोफर धानोरकर आदी उपस्थित होते.



मीनाताई मुनोत म्हणाले, आपण केलेल्या कमाईचा वाटा समाजासाठी व दिन दुबळ्या वंचित रुग्णांना दिलाच पाहिजे.अशी शिकवण व संस्कार मुथा परिवाराने दिले आहेत.हाच सामाजिक कार्याचा वसा पुढे घेऊन माझे बंधू चंद्रकांत मुथा सामाजिक कार्य करीत आहे.चार वर्षांपूर्वी त्यांनी दोन डायलेसिस मशीन आनंदऋषीजी हॉस्पिटल ला दिले आहेत. तसेच लहान भाऊ अजय मुथा यांनी एक डायलेसिस मशीन दिली आहे.आचार्य गुरुदेव यांच्या आशीर्वादाने आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आलेले सर्व रुग्ण बरे होत आहे.येथील सर्व डॉक्टर्स सेवाभावी वृत्तीने काम करीत आहे.तसेच जैन सोशल फेडरेशनचे सर्व कार्यकर्ते अत्यंत तळमळीने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत.येथे येणाऱ्या रुग्णांना अल्प दरात आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे.अहिल्यनगर जिल्ह्यासह सर्व भारतभर आनंदऋषीजी हॉस्पिटल चा नावलौकिक आहे. प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले,मीनाताई मुनोत यांनी हॉस्पिटलच्या उभारणीच्या आधीपासूनच दैनिक नगरटाईम्स च्या माध्यमातून आनंदऋषीजी हॉस्पिटल ला सहकार्य केले आहे.ताईंच्या सद्भावना व सदिच्छा आमच्या पाठीशी असल्याने जैन सोशल फेडरेशनच्या कार्यकर्त्यांना सामाजिक करताना मोठी ऊर्जा मिळत असते.तसेच उद्योजक चंद्रकांत मुथा व मुथा परिवार हा आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात पूर्वीपासूनच जोडला गेलेला आहे.मुथा परिवार हा सामाजिक कार्यात अग्रेसर आहे.मुथा परिवारासारखे अनेक परिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या कार्यात योगदान देत असल्याने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे रुग्णांसाठी भरविले जात आहेत. झोपडपट्टी,विणकर कामगार व बांधकाम कामगार करणाऱ्या गर्भवती महिला येथे उपचारासाठी येत असतात. कुपोषित बाळ जन्माला येऊ नये.यासाठी आरोग्य शिबिरांच्या मार्फत मार्च व ऑगस्ट दरम्यान मोठ्या प्रमाणात शिबिरे घेतली जातात.या शिबिराचा लाभ पाच ते सहा हजार रुग्ण घेतात.समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत रुग्णसेवा मिळावी हे आचार्य आनंदऋषीजी महाराजांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी जैन सोशल फेडरेशन चे सर्व सदस्य कार्यरत आहेत. या शिबिरात १५५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले.

दखल

# दिव्यांग बालकांसाठी शीघ्र हस्तक्षेप, समावेशक शिक्षणावर भर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** दिव्यांग बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी शीघ्र निदान, वेळेवर हस्तक्षेप आणि समावेशक शिक्षणाची भक्कम पायाभरणी करण्याच्या उद्देशाने भारतीय पुनर्वास परिषद (आरसीआय) आणि दिव्यांग सक्षमीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या 'शीघ्र हस्तक्षेपण व शाळापूर्व तयारीकरिता क्रॉस डिसॅबिलिटी दिव्यांगत्व अभ्यासक्रम आराखडा' या हस्तपुस्तिकेचे लोकार्पण यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे करण्यात आले.

यावेळी राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सचिव डॉ. माणिक गुरसाळ, महिला व बालकल्याण विभागाच्या आयुक्त माधवी सरदेशमुख, प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या सहसंस्थापिका फरिदा लांबे, राज्य प्रकल्पाचे संचालक संजय यादव आणि एससीईआरटीचे संचालक डॉ. हेमंत वसेकर यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

**दिव्यांगत्वापेक्षा व्यक्ती म्हणून पाहण्याची गरज :**

दिव्यांग व्यक्तींकडे त्यांच्या दिव्यांगत्वापेक्षा प्रथम व्यक्ती म्हणून पाहण्याची गरज असल्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सांगितले. पालक, शिक्षक आणि समाजाने प्रत्येक बालकाकडे प्रथम एक मूल म्हणून पाहावे. दिव्यांगत्व ही व्यक्तीची संपूर्ण ओळख नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




बालकाच्या आयुष्यातील पहिले १,००० दिवस अत्यंत महत्त्वाचे असून, या काळात योग्य आरोग्यसेवा, काळजी, मार्गदर्शन आणि प्रारंभिक हस्तक्षेप मिळणे आवश्यक आहे. यासाठी पालक, आरोग्य कर्मचारी, शिक्षक आणि तज्ज्ञांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. पूर्णतः दृष्टिदिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ब्रेल महत्त्वाचे असले तरी शिक्षण केवळ ब्रेलपुरते मर्यादित न ठेवता ऐकणे, बोलणे, स्पर्श आणि प्रत्यक्ष कृती यांचा वापर करावा. दृष्टिदिव्यांग विद्यार्थी गणित, विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रात पुढे जाऊ शकत नाहीत, ही धारणा बदलण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

**पाच विकास क्षेत्रांवर भर :**

हस्तपुस्तिकेत ० ते ३ वर्षांसाठी 'पहल (झएक्अङ)' आराखडा, तर ३ ते ६ वर्षांसाठी 'छखझणछ खपलश्रीर्ळींश' अंतर्गत समावेशक शाळापूर्व शिक्षणासाठी कृती पाठांचा समावेश आहे. शारीरिक, मानसिक, बौद्धिक, भावनिक आणि सामाजिक विकासासाठी पंचकोश संकल्पनेचाही समावेश करण्यात आला आहे. 'पहल'मध्ये सामाजिक-भावनिक शिक्षण, संप्रेषण-भाषा व साक्षरता, शारीरिक विकास व आरोग्य, बोधात्मक विकास आणि शिकण्याचा दृष्टिकोन या पाच क्षेत्रांवर भर आहे. विकासातील विलंब वेळेत ओळखून आवश्यक हस्तक्षेप करण्यासाठी विकासात्मक टप्पे मार्गदर्शक ठरणार आहेत. 'युनिव्हर्सल डिझाईन फॉर लर्निंग'च्या माध्यमातून विविध क्षमतांच्या बालकांना समान शिकण्याच्या संधी देण्यावर भर देण्यात आला आहे. हा अभ्यासक्रम आराखडा दिव्यांग बालकांसह सर्व बालकांच्या समावेशक शिक्षणाची पायाभरणी मजबूत करणार आहे.

## दिवे परिसरात नागपंचमी उत्साहात



**दिवे :** नागपंचमीचा सण दिवे परिसरात पारंपरिक पद्धतीने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. नागपंचमीच्या पूर्वसंध्येला महिलांनी नागदेवतेची आराधना करत उपवास केला. रात्री महिलांनी एकत्र येत पारंपरिक गाणी, उखाणे म्हणत झोका व फुगडी खेळून सणाचा आनंद लुटला.

नागपंचमीच्या मुख्य दिवशी परिसरातील शेतकऱ्यांनी शेतातील कामे बंद ठेवून सण साजरा केला. दुपारनंतर महिलांनी माळावरील वारुळाचे विधिवत पूजन केले. त्यानंतर कातोबानाथ मंदिरासमोर, ज्ञानगिता आश्रमातील विठ्ठल-रखुमाई मंदिरात तसेच जानुबाई मंदिरासमोर महिलांनी एकत्र येत पारंपरिक फेरा धरला. यावेळी पारंपरिक गाणी व उखाणे म्हणत फुगडी खेळण्यात आली.जुन्या परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपत महिलांनी नागपंचमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. यावेळी दिवे परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.फोटो ओळ : दिवे (ता. पुरंदर) येथे नागपंचमीनिमित्त वारुळाचे पूजन करताना महिला.

## भागडी शाळेची शिष्यवृत्ती परीक्षेत दमदार कामगिरी

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्यातील भागडी जिल्हा परिषद शाळेने शिष्यवृत्ती परीक्षा २०२६ मध्ये उल्लेखनीय कामगिरी केली. विद्यार्थिनी आदिती गोविंद आगळे हिने ३०० पैकी २५० गुण मिळवत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान पटकावले. स्वरा उदय आगळे आणि देविका देविदास थिटे यांनीही उत्तम गुण मिळवत शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादन केले.आदिती, स्वरा आणि देविका यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत, जिद्द व आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले. शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब गिलबिले यांनी विद्यार्थिनींच्या यशाची माहिती दिली.

शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीसाठी वर्गशिक्षक दत्तात्रय रामहरी आहिरे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शिक्षक सुरेखा जाधव, स्वाती शिंदे आणि लालन गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. नियमित सराव, प्रश्नपत्रिकांचा अभ्यास, संकल्पनांचे आकलन आणि वेळेचे नियोजन यामुळे विद्यार्थिनींना परीक्षेत उत्तम कामगिरी करता आली.



शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविल्याबद्दल आदिती आगळे हिचा सत्कार करताना शिक्षक व मान्यवर.

## आंबेगाव तालुक्यात रस्त्यांची चाळण; नागरिकांमध्ये संताप

**लोणी धामणी, आंबेगाव :** तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून



झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे. विशेषतः आदिवासी भागातील अनेक रस्ते वाहून गेले असून, काही ठिकाणी रस्ते वाहून जाऊन बराच कालावधी उलटूनही डागडुजी करण्यात आलेली नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.तालुक्यात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे सुरू आहेत. मात्र, काही कामांचा दर्जा समाधानकारक नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून करण्यात येत आहेत. संबंधित ठेकेदारांकडून कामाचा दर्जा राखला जात नसल्याने पावसाळ्यात रस्त्यांची दुरवस्था होत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. याबाबत समाजमाध्यमांवरून वारंवार आवाज उठवूनही प्रशासनाकडून ठोस कार्यवाही होत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.खराब रस्त्यांमुळे शेतमालाची वाहतूक, दूध वाहतूक तसेच दैनंदिन प्रवासात अडथळे निर्माण होत आहेत. अनेक गावांतील नागरिकांना धोकादायक परिस्थितीत प्रवास करावा लागत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रस्त्यांची तातडीने पाहणी करून डागडुजी करावी, तसेच सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा तपासावा. संबंधित ठेकेदारांवर आवश्यक ती कारवाई करावी आणि लोकप्रतिनिधींनीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देऊन रस्त्यांची समस्या मार्गी लावावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## भुलेश्वर येथे भाविकांची दर्शनासाठी गर्दी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील माळशिरस येथे प्राचीन कालीन हेमाडपंथी भुलेश्वर मंदिर आहे. या मंदिराची श्रावण महिन्यात यात्रा सुरु होते. आज श्रावण महिन्यातील पहिला सोमवार असल्याने सत्तर हजारांवर भाविकांनी भुलेश्वराचे दर्शन घेतले. पहाटे तीन वाजता मानकरी व ग्रामस्थांच्या उपस्थितीत शिवलिंगावरती अभिषेक करण्यात आला. शिवलिंगावरती आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली.श्री क्षेत्र भुलेश्वराची निलकंठेश्वर पुजा साकारण्यात आली. पहाटे पाच वाजता माळशिरस ग्रामस्थांच्या वतीने सोमेश्वर सहकारी साखर कारखाण्याचे चेअरमन पुरुषोत्तम जगताप यांनी महाआरती केली .यावेळी पंचायत समिती सदस्य माऊली यादव,माजी सरपंच अरुण यादव, माळशिरसच्या सरपंच आरती यादव, उपस्थित होते. पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपुत यांनी भुलेश्वर यात्रेची पाहाणी केली.माळशिरस येथील काळे वाडयातुन माळशिरस ग्रामस्थांच्या उपस्थितीत भुलेश्वराच्या पालखीचे श्री क्षेत्र भुलेश्वर मंदिराकडे प्रस्थान करण्यात आले.मंदिराजवळील वन विभागात विसावा देण्यात आला.भुलेश्वर देवास आंघोळ घालण्यात आली.महाआरती होऊन कावड मिरवणूक व पालखी मिरवणूक काढण्यात आली.दुपारी तीन वाजता मंदिराच्या प्रवेशद्वारावर कावडींची धार घालण्यात आली.भुलेश्वराची मंदिराच्या समोर महाआरती करण्यात आली.देवाचा छबिना वाजत गाजत मुख्य शिवलिंगाजवळ आला.प्रमुख मानकरी व माळशिरस ग्राम स्थांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली.मंदिर प्रदक्षिणा घालण्यात आली.





१) श्री क्षेत्र भुलेश्वर देवस्थान येथील शिवलिंगावर निलकंठेश्वर पुजा. २) भुलेश्वरी काढण्यात आलेली कावड व पालखी मिरवणुक .

वन विभागाच्या कमानीबाहेर वाहणे अडवण्यात आल्याने वाहन कोंडी झाली नाही.सकाळपासुनच मंदिराभोवती भाविकांची रांग लागली.भाविकांना रांगेत दर्शन देण्यात आले.जेजुरी पोलीस स्टेशनच्या वतीने पुरेसा बंदोबस्त देण्यात आला.माळशिरस प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वतीने दिवसभर आरोग्य सेवा देण्यात आली.माळशिरस ग्रामपंचायतीच्या वतीने दिवसभर फिल्टरचे पाणी पुरविण्यात आले.भुलेश्वर अन्नदान मंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले.

## नागपंचमीनिमित्त लोणीत रंगला कलगीतुरा

**लोणी (ता. आंबेगाव) :** येथे नागपंचमीनिमित्त आयोजित राज्यातील भव्य कलगीतुरा सामन्याचे यंदा ३४ वे वर्ष होते. या कार्यक्रमाला लोणी परिसरासह पुणे जिल्हा तसेच नगर जिल्ह्यातील पारनेर, संगमनेर व श्रीगोंदा तालुक्यांतील रसिकांनी मोठी गर्दी केली होती. त्यामुळे बाजारतळ परिसर रसिकांच्या गर्दीने फुलून गेला.शाहीर तान्हाजी माळवदकर (कलगीवाले), गुळुंचवाडी-बेल्हे आणि शाहीर साहेबराव पवार (तुरेवाले), किन्ही-करंडी यांच्यात झालेल्या सवाल-जबाबाने कार्यक्रमात रंगत आणली. ढोलकी, टाळ, डफ, संबळ व तुणतुण्याच्या तालावर शाहिरांनी सादर केलेल्या कवने, सवाल-जबाब आणि पहाडी आवाजातील गायनाला रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.गणगौळण, रामायण, महाभारत, पुराणकथा, शास्त्रीय सवाल, गणिती सवाल व लौकिक सवाल अशा विविध विषयांवर कलगीवाले व तुरेवाले यांच्यात रंगलेला सामना विशेष आकर्षण ठरला. देशभक्ती, सर्वधर्मसमभाव, मातृ-पितृभक्ती तसेच विविध धार्मिक विषयांवरील कवने सादर करण्यात आली. काही भावस्पर्शी कवने ऐकताना उपस्थित रसिकांचे डोळे पाणावले. कार्यक्रमाला विविध राजकीय नेत्यांनी सदिच्छा भेट देत कलाकारांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच उद्धव लंके यांनी केले.



लोणी येथे नागपंचमीनिमित्त आयोजित कलगीतुरा सामन्यात सवाल-जबाब सादर करताना कलगीवाले व तुरेवाले शाहीर.

## हजारो शिवभक्तांनी घेतले सोमेश्वर शिवलिंग दर्शन

### श्रावणी पहिल्या सोमवारी दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोमेश्वरनगर :** पुणे जिल्ह्यातील नीरा येथून आठ तर बारामती पासून तीस किलोमीटर अंतरावर करंजे येथील प्रसिद्ध श्री सोमेश्वर स्वयंभू शिवलिंग आहे. श्रावण महिन्यात दरवर्षीच विविध जिल्ह्यातूनच भाविक स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेण्यासाठी श्रावण महिन्यात येत असतात श्रावणी महिन्याचा पहिला सोम वार १७ ऑगस्ट रोजी हजारोंच्या संख्येने शिवभक्त स्वयंभू शिवलिंगाचे दर्शन घेतले.

स्वयंभू शिवलिंग महापूजा बारामती तहसीलदार स्वप्नील रावडे व संचालक ऋषिकेश गायकवाड सपत्नी पार पडली यावेळी पुणे जिल्हा पिडीसी बँक संचालक संभाजी होळकर, नीरा कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती बाळासाहेब शिंदे,



देवस्थान चेअरमन अनंत मोकाशी, सचिव सचिन भांडवलकर सह विश्वस्त मान्यवरांच्या ग्रामस्थ उपस्थित आलेल्या शिवभक्तांसाठी सकाळचे खिचडी अन्नदान श्रीराम दाते. विक्रम भोसले, इंगळे सर, संदीप साळुंखे इतर शिवभक्त यांनी केले तर अनेक शिवभक्तांनी फळे वाटपही केली एक शिवभक्त करंजेपूल तर शिवलिंग गाभारा मंदिर सजावट उद्योजक दीपक साखरे व उद्योजक आर एन बापू शिंदे यांच्या हस्ते करण्यात आली सोमेश्वर मंदिर परिसर मिठाईवाले हॉटेल व्यवसायिक ,गृह उपयोगी वस्तू ,खेळणी असे स्टॉल लागलेले आहेत. श्रावणी पहिला सोमवार निमित्त पहाटे पासूनच दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. भाविकांची मोठी गर्दी असल्याने देवस्थान सर्व परिसर सी सी टीव्ही नियंत्रणाखाली असून देवस्थान ट्रस्टमार्फत भाविकांसाठी दर्शन व्यवस्था , पिण्याचे शुद्ध पाणी, वाहनासाठी प्रशस्त पार्किंग, आरोग्य विभाग होळ च्या माध्यमातून आरोग्य व्यवस्था, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वडगांव पोलिस स्टेशन माध्यमातून चोख पोलिस बंदोबस्त, एस टी महामंडळ वतीने अधिकची बस सेवा तसेच सोमेश्वरनगर विभाग महावितरण चे कर्मचारी असल्याचे देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष अनंत मोकाशी व सचिव सचिन भांडवलकर यांनी बोलताना माहिती दिली.

## सुराज्य करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची : गिरीश महाजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** गणेशोत्सव आणि पुणे यांचे संस्कृती, परंपरा व सामाजिक एकतेचे अतूट नाते आहे. पुण्याच्या गणेशोत्सवाकडे संपूर्ण देशाचे लक्ष असते. उत्सव साजरा करताना ध्वनिप्रदूषण, शाडू मातीचा वापर आणि पर्यावरण संवर्धन याबाबत मंडळांनी विशेष काळजी घ्यावी. स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी केले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट व सुवर्णयुग तरुण मंडळातर्फे आयोजित राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेच्या पुणे शहर महापालिका क्षेत्र विभागाचा पारितोषिक वितरण समारंभ गणेश कला क्रीडा मंच येथे झाला. यावेळी पुणे महापालिका महापौर मंजुषा नागपुरे, सहा पोलीस आयुक्त संजय दराडे, ज्येष्ठ विचारवंत उल्हास पवार, परिमंडळ १ पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, सहचिटणीस अमोल केदारी



राष्ट्रीय गणेशोत्सव स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळविलेल्या शिवाजी मित्र मंडळाचे कार्यकर्ते पारितोषिक स्वीकारताना.

यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

स्पर्धेत भोसले मार्ग, भवानी पेठेतील शिवाजी मित्र मंडळाने सलग दुसऱ्या वर्षी प्रथम क्रमांक मिळविला. हडपसर येथील नवरंग मित्र मंडळ ट्रस्टने द्वितीय, अरण्येश्वर तावरे कॉलनीतील एकता मित्र मंडळ ट्रस्टने तृतीय, एरंडवणे येथील श्री शनि मारुती बाल गणेश मंडळाने चौथा, तर नारायण पेठेतील संयुक्त प्रसाद मित्र मंडळाने पाचवा क्रमांक पटकाविला.जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन म्हणाले, उत्सवांमध्ये डीजेचा वापर वाढत असून तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाणही वाढत आहे. तरुणाईने या प्रवृत्तींपासून दूर राहून उत्सवांना सकारात्मक दिशा द्यावी. ध्वनिवर्धकांच्या मर्यादा न्यायालयाने निश्चित केल्या आहेत. त्यामुळे सर्व घटकांचा विचार करून उत्सव साजरा करणे आवश्यक आहे. ट्रस्टच्या वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचेही त्यांनी कौतुक केले.

आमदार हेमंत रासने म्हणाले, गणेशोत्सवाला विधायक दिशा देण्याचे काम ट्रस्टच्या माध्यमातून सुरू आहे. पोलिसांनी कार्यकर्त्यांशी समन्वयाने काम करावे. गणेशोत्सव हा केवळ विसर्जन मिरवणुकीपुरता मर्यादित नसून दहा दिवसांचा सांस्कृतिक उत्सव आहे. धर्म, संस्कृती व परंपरा जपण्यासाठी कार्यकर्त्यांना सहकार्य करावे.

# भविष्यातील ५० वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन : नितीन गडकरी

## पुण्याच्या विकासासाठी ६० हजार कोटींची कामे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** देशाच्या आर्थिक विकासाचा पाया मजबूत करण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास अत्यंत महत्त्वाचा आहे. रस्ते, महामार्ग, पूल, बोगदे, जलमार्ग आणि दळणवळणाच्या सुविधा विकसित करताना आजच्या गरजांबरोबरच पुढील २५ ते ५० वर्षांचा विचार करून नियोजन करणे आवश्यक आहे, असे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातर्फे आयोजित 'फेस्टिव्हल ऑफ थिंकर्स कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी सिंबायोसिस च्या प्रधान संचालिका व सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचे कुलगुरू




डॉ. रामकृष्णन रमण, सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या वैद्यकीय व आरोग्य विज्ञान विद्याशाखेचे प्रोव्होस्ट, डॉ. राजीव येरवडेकर व कुलसचिव डॉ. शेजूळ आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना गडकरी यांनी पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, संशोधन, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक विकास यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला. 'नॉलेज टू वेल्थ' हा भविष्यातील विकासाचा मार्ग असून ज्ञानाचे संपत्तीत रूपांतर करण्यासाठी तंत्रज्ञान, संशोधन, नवकल्पना, उद्योजकता आणि कौशल्य विकासाला चालना देणे आवश्यक आहे.

मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेच्या निर्मितीचा अनुभव सांगताना गडकरी म्हणाले की, भविष्यातील वाहतूक लक्षात घेऊन रस्त्यांची क्षमता निश्चित केली पाहिजे. आजच्या समस्यांवर केवळ तात्पुरते उपाय करण्याऐवजी दीर्घकालीन आणि भविष्यवेधी नियोजन गरजेचे आहे. पायाभूत सुविधांमुळे उद्योग, व्यापार, पर्यटन आणि रोजगाराला मोठी चालना मिळते. वाहतूक खर्च कमी झाल्यास भारतीय उद्योग जागतिक बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक बनतील. चांगल्या रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध होते, ग्रामीण भाग मुख्य प्रवाहाशी जोडला जातो आणि नवीन उद्योग व रोजगाराच्या संधी निर्माण होतात, असे त्यांनी सांगितले.

ऑटोमोबाईल उद्योगाच्या वाढीचाही त्यांनी उल्लेख केला. तंत्रज्ञानातील प्रगती, संशोधन, इलेक्ट्रिक वाहने, पर्यायी इंधन आणि जैवइंधनामुळे भारतातील ऑटोमोबाईल उद्योगाचा विस्तार होत असून त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि निर्यातीला चालना मिळत असल्याचे गडकरी म्हणाले.

तंत्रज्ञानाचा वापर करून रस्त्यांची गुणवत्ता तपासणे, ड्रोन, एआय, लिडार आणि उपग्रह तंत्रज्ञानाच्या मदतीने दोष आधीच ओळखणे आणि 'रिपेअर आफ्टर फेल्युअर'ऐवजी 'प्रेडिक्ट बिफोर फेल्युअर' या पद्धतीने देखभाल करणे आवश्यक आहे. 'नॉलेज विथ एथिक्स' आवश्यक असून ज्ञानासोबत प्रामाणिकपणा, विश्वासार्हता, गुणवत्ता आणि मूल्ये जपली पाहिजेत. शॉर्टकटने दीर्घकाळ यश मिळत नाही, असा संदेशही त्यांनी तरुणांना दिला. विकासासोबत पर्यावरणाचे संरक्षण आणि आर्थिक प्रगती यांचा समतोल राखणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची कामे - पुण्यातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांवरही त्यांनी भाष्य केले. पुण्यात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची कामे पुढील काळात सुरू करण्याचे नियोजन असल्याचे सांगत या प्रकल्पांसाठी नावीन्यपूर्ण वित्तीय मॉडेलचा वापर केला जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

कुलपती डॉ. विद्या येरवडेकर यांनी प्रास्ताविक केले तर कुलगुरू डॉ. रामकृष्णन रमण यांनी आभारप्रदर्शन केले.

## द • ख • ल

## शहिदांच्या त्यागाचे स्मरण करावे : खिलारी



**टाकळी ढोकेश्वर :** शूरवीरांनी व क्रांतिकारकांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली त्या सर्व शहिदांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा व त्यांना अभिवादन करण्याचा आजचा दिवस आहे त्यांच्या त्यागामुळेच आज आपण मोकळा श्वास घेत आहोत असे प्रतिपादन जिल्हा जिल्हा मराठा विद्या प्रसारक संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सितारामजी खिलारी पा.यांनी केले. श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्य. विद्यालयात भारताचा ८० वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी खिलारी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी खिलारी यांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमासाठी बबनराव खिलारी, लहू जाधव, शिवराज भालके, अरुणा खिलारी, रामभाऊ तराळ, नारायण झावरे, मोहन रांधवन व सर्व सदस्य, शिवाजीराव खिलारी, बाळासाहेब खिलारी, पंडितराव झावरे, किरण झावरे, पालक, पत्रकार, ग्रामस्थ, सेवक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी केले.

## श्रावणी सोमवारनिमित्त काशी विश्वेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**राशीन :** श्रावण महिन्यातील तिसऱ्या सोमवारपासून राशीन येथील प्राचीन व जागृत श्री काशी विश्वेश्वर मंदिराच्या यात्रोत्सवास भक्तिमय वातावरणात प्रारंभ होत आहे.



श्रावणी सोमवारनिमित्त पहाटेपासूनच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली असून, 'हर हर महादेव'च्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला आहे. राशीनचे श्री काशी विश्वेश्वर मंदिर हे हेमाडपंथी स्थापत्यशैलीतील पुरातन व ऐतिहासिक मंदिर म्हणून ओळखले जाते. मंदिर परिसरात श्री वीरभद्र, श्री गणेश तसेच श्रीमंत सत्पुरुष आखोबा स्वामी यांची संजीवन समाधी असल्याने या धार्मिक स्थळाला विशेष आध्यात्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे. श्री काशी विश्वेश्वर मंदिराचा पारंपरिक रथोत्सव बुधवार, दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी भक्तिमय वातावरणात साजरा होणार आहे. रथोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री काशी विश्वेश्वराचे दर्शन व रथोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रावण सोमवारनिमित्ताने कवडेश्वर महादेवाची महापूजा

**टाकळी ढोकेश्वर :** श्रावण सोमवाराच्या पवित्र आणि भक्तिमय वातावरणात कवडेश्वर मंदिरात श्री महादेवाची महापूजा जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुजित झावरे पा.यांच्या हस्ते करण्यात आली.



यावेळी सारोळा अडवाई ते प्रसिद्ध कवडेश्वर मंदिर या रस्त्याचे लोकार्पण करण्यात आले.या रस्त्यामुळे महादेवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचा आणि स्थानिकांचा प्रवास सुखकर व सुरक्षित होणार आहे. यावेळी बाळासाहेब माळी, संगीता मोटे, संदीप ढवळे, अण्णा मोटे, परसराम फंड, देविदास आबुज, शंकर महांडुळे, मल्हारी जासूद, प्रशांत साठे, लक्ष्मण ठोकळ, योगेश ठोकळ, उत्तम बेंद्रे, जयसिंग गुंजाळ,डॉ.वैभव शिंदे,साहेबराव नरसाळे, आकाश येवले, ज्येष्ठ नागरिक, ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते. दर्शनसाठी येणाऱ्या भाविकांची उत्तम सोय झाल्याबद्दल उपस्थितांनी आणि ग्रामस्थांनी सुजित झावरे पा.यांचे आभार मानले.

## प्रवरा शैक्षणिक समूहात स्वातंत्र्यदिन साजरा

**अमरापुर :** प्रवरा शैक्षणिक समूहाच्या डॉ. बाळासाहेब विखे पाटील सी.बी.एस.ई. स्कूल व शेवगाव इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये ८०वा स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. प्रवरा शैक्षणिक समूहाचे कार्यकारी संचालक पंजाबराव आहेर पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी डॉ. संतोष पवळे, ओंकार रसाळ, महेश भालसिंग, विजय चन्ने, रमेश कवडे उपस्थित होते. रमेश लव्हाट, विलास घोरतळे, नवनाथ दारकुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही शाळांतील अग्नी, पवन, आकाश, क्षितिज तसेच रुबी, कोरल, सफायर व एमरल्ड या हाऊसच्या कॅडेट्सनी बँड पथकाच्या तालावर शिस्तबद्ध पथसंचलन करीत मान्यवरांना मानवंदना दिली. विद्यार्थी प्रतिनिधी आरुष सारडा, चैतन्य डोम तसेच विद्यार्थिनी प्रतिनिधी साची मुंदडा व सई सोळुंके यांनी पथसंचलनाचे नेतृत्व केले.

## मढीत कानिफनाथांचा प्रकट दिन संपन्न

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**तिसगाव :** श्री क्षेत्र मढी येथे कानिफनाथांचा प्रकट दिन (जन्मोत्सव ) हजारो भाविकांच्या उपस्थितीत पारंपारी पध्दतीने साजरा करण्यात आला .या सोहळ्यासाठी राज्यभरातून आलेल्या भावीकांनी सकाळपासूनच मोठ्या संख्येने गर्दी केली होती. श्री क्षेत्र मढी येथे नाथांचे गीते , कीर्तन ,भजन अशा विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कानिफनाथांचा जयजयकार करत, भक्तिमय वातावरणात मढीसह राज्यभरात कानिफनाथांच्या मंदिरामध्ये जन्मोत्सव संपन्न झाला. देवस्थान समीती व भावीकांच्या उपस्थति रविवारी सकाळी जन्मोत्सवला प्रारंभ झाला .मढी देवस्थानचे विश्वस्त मदन मरकड यांनी सपत्नीक कानिफनाथांच्या पादुकांचे विधिवत महापुजा करून आरती करण्यात आली .देवस्थान समीतीचे अध्यक्ष विठ्ठल मरकड व कार्याध्यक्ष महादेव कोकाटे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात येऊन जन्माचा पाळण्याचे गायण करत महिला नाथभक्ताच्या हस्ते पाळणा हलवण्यात आला. फाल्गुन वद्य रंगपंचमीच्या दिवशी चैतन्य कानिफनाथ महाराजांनी भगवान विष्णू व शिवशंकराच्या आदेशानुसार मढी या ठिकाणी संजीवन समाधी घेतली. गर्भागिरीचा संपूर्ण डोंगर नाथसंप्रदायने व्यापून टाकलेला आहे. याच डोंगर रांगामधे कानिफनाथ, गोरक्षनाथ, मच्छिंद्रनाथ, गहिनीनाथ आणि जालिंदरनाथ महाराजांच्या संजीवन समाध्या आहेत. रंगपंचमी सर्व श्रावणी शुक्रवार, अमावस्या व पौर्णिमा या दिवशी राज्याच्या कानाकोपऱ्यातून नाथ भक्त येथे दर्शनासाठी येतात. चैतन्य कानिफनाथांनी श्रावण शुद्ध चतुर्थीच्या दिवशी अवतार घेतला त्यांची संजीवनी समाधी असलेल्या मढी येथे कानिफनाथांचा प्रकट दिन रवीवारी कानिफनाथ मंदीर व सिद्धिविनायक सिद्धाश्रम मढी या ठिकाणी मोठ्या उत्साहात प्रकट दिन साजरा करण्यात आला. कानिफनाथ देव हा खरा! राहतो पवना गिरीच्या तिरा ।।हत्तीच्या कानात जन्मला हिरा जो बाळा जो रे जो... या जन्माचा पाळण्याचे गायण करत विवीध मान्यवराच्या हस्ते पाळणा हलवण्यात आला. यावेळी अशोक महाराज मरकड, श्रीराम महाराज मचे, अनिल महाराज वाळके, भगवान मरकड, विष्णू मरकड, श्रद्धा मरकड, दादासाहेब चितळे, उद्धव महाराज ढमाळ, कांता महाराज देवढे, विष्णू महाराज मरकड, बाबासाहेब मरकड, एकनाथ मरकड, उद्धव महाराज वाघमारे, साईनाथ महाराज कासार, सुदर्शन महाराज भोसले, हरीचंद्र मरकड, किरण मरकड, संजय मरकड, भिमराज मरकड , यासह मढी ग्रामस्थ व नाथभक्त, गोंविद बच्छाव यांच्या महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ठाकूर पिंपळगाव ते खडका-मडका-पैठण मार्गासाठी अन्नत्याग उपोषण सुरू



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील ठाकूर पिंपळगाव ते खड्का - मडका - पैठण या मार्गाच्या कामासाठी तालुक्यातील प्रभुवाडगाव येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक माणिकराव ढाकणे, गावच्या माजी सरपंच गंगुबाई रंगनाथ बटूळे यांच्यासह काही ग्रामस्थानी प्रभुवाडगाव येथील श्री प्रभुस्वामी मंदिरात काल सोमवार (दि.१७)पासून अन्नत्याग उपोषणास प्रारंभ केला आहे. या बाबत अशोक ढाकणे यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांची समक्ष भेटून सविस्तर चर्चा करून निवेदन दिलेले आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेली अनेक वर्षापासून ठाकूर पिंपळगाव ते खड्का - मडका - पैठण हा मार्ग पूर्ण करण्यात यावा तसेच खड्का - मडका शिवारातील मार्गांवरील असणारे अतिक्रमण तात्काळ हटवावे तसेच याच प्रमुख मागणीसाठी या पूर्वी आदेश होऊनही कारवाई झाली नसल्याने दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई व्हावी आणि मागणी प्रमाणे जे रस्त्याचे अर्धवट काम झालेले आहे ते पूर्ण करण्यात यावे ही आमची प्रमुख मागणी असून या प्रमुख मागणीसाठी आम्ही अन्नत्याग उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या बाबत ढाकणे यांनी सांगितले आहे की, वरील मार्गाच्या कामासाठी १० ते १२ वर्षापासून संसदेपर्यंत आमचा लढा सुरू असताना २ वर्षापूर्वी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून या मार्गाच्या कामास मंजुरी मिळूनही या मार्गाचे काम पूर्ण होत नसून मार्गावरील असणारे अडथळे हटवण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांनी अतिक्रमण करणाऱ्यावर कुठलीच कारवाई केली.

## जामखेडला नागेश्वराच्या पावनभूमीत नागपंचमीला कुस्त्यांचा थरार

### कै. विष्णू उस्ताद काशीद प्रतिष्ठानच्यावतीने सलग २४ व्या वर्षी मैदानाचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** जामखेड ची पंचमी राज्यात खूप नाव लौकिक अनेक हौसे नवसे या यात्रेला अगदी आवर्जून हजेरी लावतात परंतु अलीकडच्या काही दिवसात ही यात्रा चर्चेत आली ती कै. विष्णू उस्ताद काशीद प्रतिष्ठान यांच्या वतीने मराठा गौरव युवराज काशीद व उपमहाराष्ट्र केसरी बबन काशीद यांच्या मार्गदर्शनाखाली व जिल्हा नियोजन समितीचे सदस्य ॲड अजय काशीद यांच्या नियोजनाने आयोजित केलेल्या या भव्य दिव्या निकाली कुस्त्याच्या मैदानाने. आणि त्याच कारण ही तसच आहें कारण हे एकमेव मैदान असे आहें जिथं वेगवेगळ्या राज्यातून पैलवान कुस्ती करण्यासाठी येतात त्याच बरोबर विविध राज्यातील धार्मिक, सामाजिक, राजकीय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची या मैदानाला आवर्जून उपस्थिती असते.

नागपंचमी यात्रेनिमित सालाबादप्रमाणे या वर्षीही कै. विष्णू उस्ताद काशीद प्रतिष्ठान च्या वतीने ॲड अजय काशीद मित्र परिवाराच्या वतीने दिला. आज १८ ऑगस्ट रोजी दुपारी एक वाजता जामखेड येथे जामखेड महाविद्यालय मैदानावर महाराष्ट्र राज्याचे विधानपरिषद चे सभापती प्रा. राम जी शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये भव्य दिव्य निकाली कुस्त्यांचं मैदान आयोजित करण्यात आले आहें.दुपारी बारा वाजता जामखेड येथील शनी मंदिरातून मिरवणूकीला प्रारंभ होईल या मिरवणूकीच प्रमुख आकर्षण म्हणजे मराठा गौरव युवराज काशीद मराठी भाषिय संघ अध्यक्ष मध्यप्रदेश यांची उपस्थिती लाभणार आहे.

या मैदानाची पहिली मानाची कुस्ती पै. रविराज चव्हाणआंतरराष्ट्रीय आखाडा पुणे विरुद्ध महारुद्र का ळेज कुर्डुवाडी यांची होणार आहें तसेच दुसरी कुस्ती पै. मोईन पटेल कुर्डुवाडी विरुद्ध मुसा पहलवान महापौर केसरी इंदोर यांच्यात होणार आहें. तिसरी कुस्ती रोहित दैया शाहू कुस्ती केंद्र विरुद्ध पै. शाहरुख खान पुणे यांच्यात होणार आहे, चौथी कुस्ती सौरभ गाडे पाटोदा विरुद्ध तात्या घुले कोल्हापूर तर पाचवी कुस्ती पृथ्वीराज वनवे शंभूराजे कुस्ती संकुल जामखेड विरुद्ध अमोल दिंडे चाऊस आष्टी यांच्यात होणार आहे.यावर्षी कुस्त्यांचे नियोजन करत असताना नेमून दिलेल्याच कुस्त्या होतील त्याव्यतिरिक्त एकही कुस्ती ऐनवेळी लावली जाणार नाही.

राज्यातील पैलवान सोबतच बाहेरील राज्यातील पैलवानांची उपस्थिती या मैदानाच एक आगळ वेगळं वैशिष्ट्य आहे. यापूर्वी अनेक नामांकित पैलवानाची या मैदानाला हजेरी लागलेली आहे. जामखेड सारख्या ग्रामीण भागात या सर्व कुस्तीपटु साठी इतक्या मोठ्या प्रमाणात अजय काशीद यांच्या वतीने हे मैदान दरवर्षी उपलब्ध करून दिले जाते अनेक तरुण आज व्यसनाधीन वेगवेगळ्या वाम मार्गाला जात असताना त्यांच्यासाठी हे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम अजय काशीद यांच्या वतीने होतं आहे.

## शेकटे खुर्द येथे एकल महिलांच्या हस्ते ध्वजारोहण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** भारतीय स्वातंत्र्याचा ८० वा स्वातंत्र्यदिन शेवगाव तालुक्यातील शेकटे खुर्द येथील ग्रामपंचात कार्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला असून या वेळी गावातीलच असणाऱ्या गोदावरी मार्कंडे या एकल महिलेच्या शुभहस्ते ध्वजारोंन करण्यात आले आहे. अशी माहिती स्त्री शक्ती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रथम सोनवणे यांनी दिली आहे. या बाबत माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की, भारत देशाला स्वातंत्र्य मिळून ८० वर्ष पूर्ण झाले असून या देशातील एकल महिला समाजापासून दूर न जाता त्यांना त्यांचे हक्क व अधिकार प्राप्त होण्यासाठी राज्यात वेग - वेगळ्या संस्था व संघटना मोठ्या जोमाने प्रयत्न करत असताना दिसत आहे.मात्र स्वातंत्र्यदिनानिमित्त एक बाब निश्चित सिद्ध होत आहे की, ग्रामीण भागाच्या डोंगराळ परिसरातील एका छोट्या असणाऱ्या



शेकटे खुर्द या गावात ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक व सरपंच आणि सर्वच प्रमुख ग्रामस्थानी स्वातंत्र्यदिनाचा ध्वज फडकविण्याचा व याच कार्यक्रमात अध्यक्ष होण्याचा जो बहुमोल असा मान एकल महिला वर्गाला मिळाला तो निश्चितच प्रेरणादाई असल्याबाबतचीही माहिती सोनवणे यांनी दिली आहे. या कार्यक्रमास लक्ष्मण राठोड, बाळासाहेब मार्कंडे, शंकर राठोड, अमोल मार्कंडे, गणेश मार्कंडें, शिवनाथ चव्हाण, अर्जुन वाघ, ज्ञानेश्वर मार्कंडे, अंगणवाडी सेविका, मदतनीस व ग्रामस्थ उपस्थित होते.

## हातगाव,मुंगी व कांबीत स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**हातगाव :** भारत देशाचा ८० वा स्वातंत्र्यदिन शेवगाव तालुक्यातील हातगाव,मुंगी व कांबी येथे उत्साहात साजरा करण्यात आला आहे. हातगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत प्रशासक अरुण मातंग यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले असून या वेळी सर्व विद्यमान सदस्य, ग्रामविकास अधिकारी संजय दारूणकर ,ग्राममहसूल अधिकारीविजय मोरे,कृषी सहाय्यक सुभाष बारगजे, जि प शाळेचे मुख्याध्यापक गणेश पुरुषोत्तम सर्व शिक्षक,विद्यार्थी, अंगणवाडीच्या सर्व सेविका,मदतनीस यांच्यासह असंख्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रा. भाऊसाहेब मुरकुटे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. असून यावेळी शिवाजी पाटील, ज्ञानदेव अभंग, अंकुश झज, ए. आय. सय्यद व सर्व शिक्षक उपस्थित होते. असून यावेळी शंकर भराट यांच्यासह सर्व संचालक व कर्मचारी उपस्थित होते.

मुंगी येथे ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच ललिता ढमढेरे यांचे हस्ते तर जिल्हा परिषद शाळेत, वंदना घोटाळे यांचे हस्ते, सेवा संस्थेत चेअरमन गणेश देशमुख यांचे हस्ते व श्री मुंगादेवी विद्यालयात प्राचार्य इकरार शेख यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले असून या वेळी ग्रामविकास अधिकारी आर आर राठोड यांच्यासह ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य व ग्रामस्थ, जि.प.शाळेचे मुख्याध्यापक सुरेश वाघमारे त्यांचे सर्व शिक्षक मुंगादेवी विद्यालयाचे सर्व शिक्षक उपस्थीत होते.

## खेड-भीमानदी पुलावरील खड्ड्यांना अखेर डांबरीकरणाचा मुलामा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राशीन :** खेड-भीमानदी पुलावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे वाहनचालक व प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत होता. त्यातच पावसामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असल्याने खड्ड्यांचा अंदाज येत नव्हता. त्यामुळे अपघातांची संख्या वाढून पुलावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला होता.

या गंभीर समस्येकडे शिवसेना नेते तथा बाबुळगाव दुमाला माजी सरपंच बिभीषण दादा गायकवाड यांनी प्रशासनाचे वेळोवेळी लक्ष वेधून सातत्याने पाठपुरावा केला. तसेच दैनिक राष्ट्र सह्याद्रीनेही या रस्त्याच्या दुरवस्थेचा मुद्दा प्रभावीपणे मांडत प्रशासनाचे लक्ष वेधले. अखेर प्रशासनाने या समस्येची तात्काळ दखल घेत खेड-भीमानदी पुलावरील खड्डे बुजविण्याचे व डांबरीकरणाचे काम सुरू केले आहे. काम वेगाने सुरू झाल्याने परिसरातील नागरिक व वाहनचालकांनी



समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे, प्रशासनाच्या विरोधात आंदोलन करण्याची वेळ येण्यापूर्वीच प्रशासनाने नागरिकांच्या समस्येची दखल घेत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. त्यामुळे बिभीषण दादा गायकवाड यांच्या पाठपुराव्यासह दैनिक राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्ताचीही प्रभावी दखल घेतल्याचे चित्र आहे. पुलावरील खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून, भविष्यात अशा धोकादायक परिस्थितीची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी संबंधित विभागाने रस्त्याची नियमित देखभाल करावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# ज्या किल्ल्यात कैद केले, त्याच आग्र्यात आज शिवरायांचा जयघोष!

## १७ ऑगस्टचा दिवस दरवर्षी आग्र्यात साजरा करण्याचा मराठा महासंघाचा निर्धार : दहातोंडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :** एकेकाळी ज्या आग्र्याच्या बलाढ्य किल्ल्यात छत्रपती शिवाजी महाराजांना नजरकैदेत ठेवण्यात आले, त्याच ऐतिहासिक किल्ल्यासमोर सोमवारी शिवरायांचा जयघोष घुमला. महाराजांनी औरंगजेबाच्या नजरकैदेतून चातुर्याने सुटका करून घेतल्याच्या ऐतिहासिक घटनेला ३६० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे आग्र्यात 'जागर शिवछत्रपतींचा' या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

किल्ल्यासमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. फुलांची उधळण, भगवे झेंडे आणि 'छत्रपती शिवाजी महाराज की जय'च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला.

या ऐतिहासिक क्षणाला आग्र्याचे खासदार राजकुमार चाहार यांच्यासह महाराष्ट्रातून आलेल्या मराठा महासंघाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

'१७ ऑगस्ट म्हणजे चातुर्याचा दिवस'म्हणून अखिल भारतीय मराठा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी दहातोंडे पाटील यांनी या उपक्रमाची घोषणा केली.

ते म्हणाले, ''१७ ऑगस्ट हा केवळ दिनदर्शिकेतील एक दिवस नाही तर जगाच्या इतिहासातील असामान्य चातुर्याची साक्ष देणारा दिवस आहे. अत्यंत कडेकोट बंदोबस्त आणि भक्कम तटबंदी असलेल्या आग्रा किल्ल्यातून छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली सुटका ही त्यांच्या असामान्य बुद्धिमत्ता, धाडस आणि नियोजनाची प्रचिती देणारी घटना आहे.''

''या इतिहासातील पाऊलखुणा केवळ पुस्तकांमध्ये बंदिस्त न राहता नव्या पिढीच्या मनात पोहोचल्या पाहिजेत. शिवरायांच्या पराक्रमाची जाणीव आणि इतिहासाबद्दल अभिमान निर्माण करण्यासाठी यापुढे



दरवर्षी १७ ऑगस्ट रोजी आग्रा येथे 'जागर शिवछत्रपतींचा' हा उपक्रम आयोजित केला जाईल,'' असे दहातोंडे पाटील यांनी सांगितले.

### आग्र्याच्या मातीतून महाराष्ट्रभर शिवरायांचा जागर

आग्र्यातील कार्यक्रमाने या उपक्रमाची सुरुवात झाली असली तरी त्याचा विस्तार महाराष्ट्रभर केला जाणार आहे. वर्षभर विविध ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास, आग्रा सुटकेचा प्रसंग, स्वराज्याची संकल्पना आणि शिवरायांचे व्यवस्थापन व युद्धकौशल्य याबाबत जनजागृती करणारे कार्यक्रम घेण्यात येणार असल्याचे दहातोंडे पाटील यांनी स्पष्ट केले.

शिवरायांच्या आग्रा सुटकेचा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे, ऐतिहासिक स्थळांचे महत्त्व अधोरेखित करणे आणि समाजात इतिहासाबद्दल जागर निर्माण करणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

> ३६० वर्षांनंतरही इतिहास जिवंत असून आग्रा किल्ला मधील कैद, चातुर्य आणि सुटका! ३६० वर्षांपूर्वी याच किल्ल्यात घडलेल्या ऐतिहासिक प्रसंगाचे स्मरण करत आज मराठा महासंघाच्या कार्यकर्त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर फुलांची उधळण करून शिवजयजयकार करण्यात आला. ''इतिहास जपायचा असेल तर तो नव्या पिढीला सांगावा लागेल,'' या भूमिकेतून 'जागर शिवछत्रपतींचा' उपक्रम सुरू करण्यात आला.

### खासदार चाहार यांच्यासह पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

कार्यक्रमास आग्र्याचे खासदार राजकुमार चाहार, महासंघाचे अध्यक्ष दिलीपदादा जगताप, प्रदेशाध्यक्ष तथा राष्ट्रीय सरचिटणीस संभाजी दहातोंडे पाटील, उपाध्यक्ष संतोष नानावटे, दिलीप धंदरे, मुंबई विभागाचे अध्यक्ष अविनाश राणे, संयुक्त चिटणीस राजेश घाणेकर, महाराष्ट्र कार्याध्यक्ष महेश सावंत, कोषाध्यक्ष अनंत मोरे, मंगेश शिर्के, मयूर गुजर, धोंडू जाधव, नागपूरच्या वंदना होटकर, उदयसिंह पाटील, किशोर घाग, अहिल्यानगरचे रावसाहेब मरकड, शामराव पवार शारदा गवांदे, जयसिंग मोरे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

किल्ल्याच्या प्रवेशद्वारावर फुलांची उधळण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा सुटकेच्या घटनेला ३६० वर्षे पूर्ण झाल्याने किल्ल्याच्या प्रवेशद्वारासमोर विशेष अभिवादन करण्यात आले.

महाराजांच्या पुतळ्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली. उपस्थितांनी एकत्रितपणे शिवजयजयकार केला. काही क्षणांसाठी आग्र्याच्या ऐतिहासिक परिसरात महाराष्ट्राच्या भगव्या इतिहासाची जणू पुन्हा अनुभूती आली.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
मंगळवार दि.१८ ऑगस्ट २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# निसर्ग लॉजमध्ये मध्यरात्री जुगाराचा डाव उधळला

## १७ जण ताब्यात, ३४.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : शहरातील जुन्या नागपूर-मुंबई महामार्गालगत कांदा मार्केट परिसरातील धनश्री हॉटेलच्या वर असलेल्या निसर्ग लॉजमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर वैजापूर पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई केली. पोलिसांनी लॉजमध्ये छापा टाकून पैशांची बाजी लावत जुगार खेळणाऱ्या तब्बल १७ जणांना ताब्यात घेतले. या कारवाईत रोख रकमेसह तब्बल ३४ लाख ७० हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



या कारवाईमुळे शहरात सुरू असलेल्या अवैध जुगाराच्या अड्ड्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १७ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे १२.२५ वाजता पोलिसांना निसर्ग लॉजमध्ये काही जण पैशांची बाजी लावून 'झन्ना-मन्ना' नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. माहिती मिळताच पोलिसांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कळवून पंचांच्या उपस्थितीत कारवाईची तयारी केली. त्यानंतर पोलिस पथकाने धनश्री हॉटेलच्या वर असलेल्या निसर्ग लॉजवर छापा टाकला. पोलिस पथक लॉजमध्ये पोहोचले असता काही जण ताशाच्या पत्त्यांवर पैशांची बाजी लावत जुगार खेळताना आढळून आले.

पोलिसांनी घटनास्थळावरून नितेश नानासाहेब करहाळे, सुनील बबन पेहरकर, गणेश मनोजसिंग राजपूत, आशीतोष बाबासाहेब बोडखे, विश्वनाथ रामदास धामे, प्रथमेश संजय उचित, हंसराज आंबादास जगताप, रविंद्र प्रकाश रोरे, करण भाऊसाहेब जाधव, पुष्पक भाऊसाहेब जाधव, राजू बुट्टे, कुणाल राजपूत, हर्षद राजपूत, सुरज महेर, कुणाल अशोक राजपूत, करण भगवानसिंग राजपूत आणि आकाश शिवाजी पेहरकर यांना ताब्यात घेतले.

### मोबाईलपासून कारपर्यंत लाखोंचा मुद्देमाल

या कारवाईत पोलिसांनी जुगाराच्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला. यामध्ये रोख रक्कम, विविध कंपन्यांचे महागडे मोबाईल, मोटारसायकली तसेच कारचा समावेश आहे. पोलिसांच्या पंचनाम्यानुसार जप्त करण्यात आलेल्या सर्व मुद्देमालाची एकूण किंमत ३४ लाख ७० हजार ३७० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे. जप्त करण्यात आलेल्या वस्तूंमध्ये आयफोन, सॅमसंग, विवो, रिअलमी यांसह विविध कंपन्यांचे मोबाईल आहेत. त्याचबरोबर रॉयल एनफिल्ड, इतर दुचाकी तसेच कारचाही समावेश आहे. जुगारासाठी वापरण्यात आलेल्या ताशाच्या पत्त्यांच्याही गड्ड्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत.

### हॉटेल मालकावरही कारवाई

या प्रकरणात केवळ जुगार खेळणाऱ्यांवरच नव्हे तर जुगारासाठी जागा उपलब्ध करून दिल्याच्या आरोपावरून धनश्री हॉटेलचे मालक यश दौलत गायकवाड यांच्याविरुद्धही कारवाई करण्यात आली आहे. हॉटेलच्या वर असलेल्या लॉजमध्ये जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी ही कारवाई केली.

या प्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात संबंधित आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यासह विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मध्यरात्री झालेल्या या कारवाईत मोठ्या प्रमाणात रोख रक्कम आणि महागडी वाहने जप्त झाल्याने शहरातील अवैध जुगार व्यवसायाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. दरम्यान, लॉजसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात जुगार सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर तातडीने करण्यात आलेल्या या कारवाईचे नागरिकांकडूनही लक्ष वेधले जात आहे. शहरातील इतर जुगार अड्ड्यांवरही अशाच प्रकारे कारवाई होणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# भेर्डापूरमध्ये अवैध वाळू वाहतूक करताना दोघे जेरबंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भेर्डापूर परिसरात प्रवरा नदीपात्रातून अवैध वाळूची वाहतूक करणाऱ्या दोघा जणांना स्थानिक गुन्हे शाखा व तालुका पोलिसांनी संयुक्त कारवाई करत ताब्यात घेतले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिजीत राऊत आणि रोहित राऊत (दोघे रा. भेर्डापूर) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. गुप्त बातमीदाराच्या माहितीवरून पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी ५,००,००० रुपये किमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो आणि १०,००० रुपये किमतीची वाळू, असा एकूण ५,१०,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

आरोपींविरुद्ध श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२) आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# राष्ट्र सहयाद्रीच्या स्वातंत्र्य दिन विशेषांकांचे

## पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते प्रकाशन




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : दै. राष्ट्र सहयाद्रीने स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून काढलेल्या स्वातंत्र्य दिन विशेषांकांचे प्रकाशन नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते व सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक नेवासा गावचे भूमीपूत्र शंकरराव बडवे,सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. यावेळी नेवासा पोलीस स्टेशनच्या प्रांगणात मुख्य ध्वजारोहण पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या हस्ते करण्यात आले.सज्जनांचे रक्षण व दृष्ट प्रवृत्तीचा नायनाट हेच ध्येय ठेऊन आपल्याला काम करायचे आहे,कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी साम,दाम दंड भेद नीती वापरून राष्ट्रीय उन्नतीसाठी आपल्याला प्रयत्न करायचा आहे त्यादृष्टीने वाटचाल करण्यासाठी तत्पर राहण्यासाठी प्रयत्न करा असे आवाहन त्यांनी यावेळी बोलताना दिला. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार यांनी संचालन करून मानवंदना दिली. राष्ट्र सहयाद्रीने काढलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन यावेळी करण्यात आले. झालेल्या प्रकाशन प्रसंगी राष्ट्र सहयाद्रीचे तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक अमोल पवार,सेवानिवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकारी शंकर बडवे, पोलीस निरीक्षक विकास पाटील, उपनिरीक्षक संदीप शिंदे,उपनिरीक्षक श्रध्दा वैद्य यांच्यासह पोलीस बांधव उपस्थित होते.

# कर्जतचे सुपुत्र नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांना अति उत्कृष्ट सेवा पदक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कर्जत** : कर्जतचे भूमिपुत्र तथा सिपी नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक प्रमोद भास्करराव तोरडमल यांना पोलीस सेवेत केलेल्या उल्लेखनीय व गुणवत्तापूर्वक कार्याबद्दल भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर अति उत्कृष्ट सेवा पदकाने नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. दरवर्षी पोलीस दलात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आपल्या सेवाकाळात विविध पदावर उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांना भारत सरकार गृह मंत्रालयाकडून विविध पदकाने गौरविण्यात येते. यंदाच्या स्वातंत्र्यदिनाच्या औचित्यावर महाराष्ट्र पोलीस दलातील कर्जतचे सुपुत्र तथा सिपी नवी मुंबईचे पोलीस निरीक्षक प्रमोद तोरडमल यांना अति उत्कृष्ट सेवा पदकाने गौरविण्यात आले. यापूर्वी पोलीस निरीक्षक तोरडमल यांना २०१८ साली राज्याचे पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले होते. यासह २०२२ मध्ये केंद्रीय गृहमंत्री यांच्याकडून उत्कृष्ट अन्वेषण पदकाने गौरविण्यात आले. आजमितीस त्यांनी पोलीस दलात विविध पदावर केलेल्या कार्याबद्दल ३४५ प्रशस्तीपत्र प्राप्त केले आहे. १५ ऑगस्टदिनी अति उत्कृष्ट सेवा पदक मिळाल्याबद्दल कर्जतकरांनी जल्लोष व्यक्त केला.

# बँडच्या सुरांत वाढला, आता अधिकारी झाला !

## कोंढवडच्या अभिषेकची प्रेरणादायी भरारी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**राहुरी** : एका हातात बँडचे वाद्य घेऊन कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारे वडील... मोलमजुरी करून संसाराचा गाडा ओढणारी आई... आणि या कष्टांच्या सावलीत मोठे होत सरकारी अधिकारी होण्याचे स्वप्न पाहणारा मुलगा. ही संघर्षाची कहाणी आहे राहुरी तालुक्यातील कोंढवड येथील अभिषेक सिताराम चव्हाण यांची. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत मुद्रांक निरीक्षक पदासाठी अनुसूचित जाती सर्वसाधारण प्रवर्गातून २७३.५० गुण मिळवत त्यांनी सहावे स्थान पटकावले आहे. अभिषेक यांचे वडील सिताराम चव्हाण बँड वाजवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात, तर आई रत्नमाला चव्हाण मोलमजुरी करून संसाराला हातभार लावतात.

आर्थिक परिस्थिती प्रतिकूल असतानाही आई-वडिलांच्या कष्टांनी अभिषेक यांच्या स्वप्नांना बळ दिले. आजोबा मारुती चव्हाण आणि आजी गयाबाई चव्हाण यांच्या संस्कारांचीही त्यांच्या जडणघडणीत मोठी भूमिका राहिली. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी साधनांची कमतरता आणि आर्थिक अडचणी होत्या; मात्र अभिषेक यांनी अभ्यासातील सातत्य सोडले नाही. नियोजन, कठोर परिश्रम आणि ध्येयावरील विश्वासाच्या जोरावर त्यांनी अखेर यश मिळवले. निकाल जाहीर होताच कोंढवडमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी अभिषेक यांची भव्य मिरवणूक काढून स्वागत केले. बँडच्या सुरांत कुटुंबाचा संसार चालवणाऱ्या वडिलांच्या मुलाने आज सरकारी सेवेत अधिकारी म्हणून स्थान मिळविल्याने चव्हाण कुटुंबाच्या संघर्षाला अभिमानाची किनार लाभली आहे.

# फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांना रस्त्यात अडवून लुटले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : कर्जाच्या हप्त्यांची वसुली करून मोटारसायकलवरून राहुरीकडे परतणाऱ्या फायनान्स कंपनीच्या दोन अधिकाऱ्यांना अज्ञात पाच जणांनी रस्त्यात अडवून मारहाण करत रोख रकमेसह टॅब व मोबाईल असा सुमारे ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल लुटल्याची घटना ११ ऑगस्ट रोजी रात्री घडली. श्रीकांत संतोष पोपळघट (वय २६, रा. मोरगे वस्ती, श्रीरामपूर) यांनी राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोपळघट हे मल्हारवाडी रोडवरील क्रेडिट क्सेस ग्रामीण लिमिटेड या मायक्रो फायनान्स कंपनीत केंद्र व्यवस्थापक म्हणून कार्यरत आहेत. ११ ऑगस्ट रोजी ते शाखा व्यवस्थापक विलास भाऊराव पडघन यांच्यासोबत म्हैसगाव व चिकलठाण परिसरात कर्जहप्त्यांची वसुली करण्यासाठी गेले होते. दिवसभरात त्यांनी ४८ हजार ५४ रुपये वसूल केले. रात्री दहाच्या सुमारास ताहाराबाद येथून राहुरीकडे येत असताना चिंचाळे पाटीपुढील पेट्रोल पंपासमोर दोन मोटारसायकलवरून आलेल्या पाच जणांनी त्यांच्या दुचाकीला दांडा मारला. दोघे खाली पडल्यानंतर आरोपींनी दांड्याने व गोफणीच्या दगडांनी मारहाण केली. त्यानंतर रोख रक्कम, टॅब असलेल्या दोन बॅगा व दोघांचे मोबाईल हिसकावून आरोपी राहुरीच्या दिशेने पसार झाले. याप्रकरणी अज्ञात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# स्वामी समर्थ मंदिराची दानपेटी फोडून रोकड लंपास;

## चोरी सीसीटीव्हीत कैद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी शहरातील कोरडे मळा परिसरातील श्री स्वामी समर्थ मंदिरात अज्ञात दोन चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास प्रवेश करून दानपेटी फोडून रोकड लंपास केल्याची घटना १४ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली. चोरीची घटना मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे. कोरडे मळा येथे श्री स्वामी समर्थ मंदिर असून भाविकांकडून दानपेटीत नियमितपणे रोख रक्कम अर्पण केली जाते. मंदिर सकाळी व सायंकाळी दर्शन व पूजेसाठी काही काळ खुले असते. इतर वेळी मंदिराला कुलूप लावण्यात येते. १४ ऑगस्ट रोजी सकाळी एक महिला भाविक दर्शनासाठी गेल्या असता मंदिराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला दिसला. त्यांनी परिसरातील नागरिकांना याची माहिती दिल्यानंतर काही नागरिक मंदिरात गेले. त्यावेळी मंदिरातील दानपेटी गायब असल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरट्यांनी रात्री मंदिराच्या दरवाजाचा कडी-कोयंडा तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर दानपेटी तोडून काढत ती घेऊन ते पसार झाले. या घटनेचे दृश्य सीसीटीव्हीमध्ये कैद झाले असून, त्याआधारे पोलिसांकडून तपास सुरू आहे. धनंजय रत्नाकर नांगरे (वय ५०, रा. तनपुरे खळवाडी, राहुरी) यांच्या फिर्यादीवरून राहुरी पोलिस ठाण्यात अज्ञात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# कांदा उत्पादकांनी संधीचा फायदा घ्यावा

## टप्प्याटप्प्याने विक्रीचा तागड मामांचा सल्ला

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : गेल्या महिनाभरापासून कांद्याचे भाव दोन हजार ते दोन हजार सातशे रुपये प्रतिक्विंटलच्या दरम्यान होते. मात्र, गेल्या चार-पाच दिवसांत कांद्याच्या दरात तब्बल ५०० ते ७०० रुपयांची वाढ झाली आहे.

त्यामुळे सध्याची बाजारातील तेजी ही कांदा उत्पादक शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची संधी असल्याचे मत कांदा बाजाराचा अभ्यास करणारे तागड मामा यांनी व्यक्त केले आहे. कांदा उत्पादकांकडून कांदा खराब होत असल्याने तसेच आंध्र प्रदेश आणि कर्नाटकातील कांदा बाजारात आल्यानंतर दर घसरण्याची शक्यता असल्याने मोठ्या प्रमाणात विचारणा होत आहे. मात्र, यंदाची परिस्थिती मागील वर्षापेक्षा वेगळी असल्याचे तागड मामा यांनी सांगितले.



एप्रिल महिन्यात झालेल्या पावसामुळे मोठ्या प्रमाणावर कांदा शेतातच खराब झाला. शिल्लक राहिलेला कांदाही चाळीत सडत असल्याने बाजारात चांगल्या कांद्याचा तुटवडा निर्माण होत आहे.

त्यामुळे कांद्याच्या दरात वाढ होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कांद्याचे भाव लवकरच पाच हजारांचा टप्पा पार करण्याची शक्यता असल्याचा अंदाजही त्यांनी व्यक्त केला. बाजारातील दबाव, अफवा किंवा चुकीच्या बातम्यांमुळे घाबरून शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण कांदा एकाच वेळी विकू नये, असे आवाहन त्यांनी केले. यावर्षी कांदा विक्रीचा निर्णय घाईने घेऊ नका. जागेवरच संपूर्ण कांदा विकण्याऐवजी जवळच्या बाजारपेठेत टप्प्याटप्प्याने कांदा विक्री करा. बाजारातील परिस्थितीचा अंदाज घेत विक्री केल्यास शेतकऱ्यांना दोन पैसे अधिक मिळू शकतात, असे तागड मामा यांनी सांगितले.

त्यामुळे कांदा उत्पादकांनी सध्याच्या दरवाढीचा योग्य फायदा घेत खराब कांदा आधी बाजारात आणावा आणि चांगल्या प्रतीचा कांदा नियोजनपूर्वक साठवून टप्प्याटप्प्याने विकावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### खराब कांदा आधी विकावा

सध्या खराब होत असलेला कांदा तातडीने विकावा, तर चांगल्या प्रतीचा आणि साठवण क्षमतेचा कांदा एकाच वेळी बाजारात न आणता टप्प्याटप्प्याने सप्टेंबर, ऑक्टोबर आणि नोव्हेंबरपर्यंत विक्री करावा, असा सल्ला तागड मामा यांनी दिला आहे.

# पोलीस उपनिरीक्षक संपत खैरे यांना राष्ट्रपती पोलीस पदक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सुपा** : सुपा पोलीस स्टेशन येथे कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक संपत मुरलीधर खैरे यांना भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त उल्लेखनीय व उत्कृष्ट सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाले आहे. त्यांच्या प्रदीर्घ, निष्ठावान आणि निष्कलंक पोलीस सेवेला मिळालेला हा राष्ट्रीय स्तरावरील गौरव आहे. या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. संपत खैरे हे १३ फेब्रुवारी १९९१ रोजी नाशिक ग्रामीण पोलीस दलात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून सेवेत रुजू झाले. त्यानंतर त्यांनी नाशिक ग्रामीण पोलीस दल, पोलीस मुख्यालय अहिल्यानगर, सोनई पोलीस स्टेशन, एमआयडीसी पोलीस स्टेशन अहिल्यानगर, स्थानिक गुन्हे शाखा अहिल्यानगर, नगर तालुका पोलीस स्टेशन आणि सध्या सुपा पोलीस स्टेशन येथे कार्यरत आहेत. आपल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना सन २००८ मध्ये एक वाढीव वेतनवाढ मिळाली होती. १ मे २०१० रोजी पोलीस महासंचालक यांच्या पदकाने त्यांचा गौरव केला होता. आजपर्यंतच्या सेवाकाळात त्यांना तब्बल २५५ बक्षिसे मिळाली आहेत. विशेष म्हणजे, सुमारे ३५ वर्षे ६ महिन्यांच्या सेवाकाळात वरिष्ठांकडून एकही शिक्षा झालेली नाही, ही त्यांच्या कर्तव्यनिष्ठ आणि शिस्तबद्ध कार्यपद्धतीची विशेष बाब आहे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, शिस्त, तपासकौशल्य आणि जनसेवेची भावना या गुणांमुळे श्री. खैरे यांनी पोलीस सेवेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत त्यांना यापूर्वीही विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून, आता राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झाल्याने त्यांच्या सेवेला राष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. त्यांच्या या गौरवाबद्दल पोलीस अधिकारी, कर्मचारी, नागरिक, मित्रपरिवार आणि विविध सामाजिक स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.